महाराष्ट्र विधानसभा

दुसरे अधिवेशन, २०२२

अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

प्रश्नांची एकूण संख्या - ५०

महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद तर्फे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी केलेले आंदोलन

(१) ९४१ (०८-०४-२०२०). श्री.प्रमोद (राजू) रतन पाटील (कल्याण ग्रामीण), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.किसन कथोरे (मुरबाड), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदे तर्फे शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी यशवंत स्टेडियम, धंतोली नागपूर येथे आपल्या प्रलंबित मागण्यांसाठी दिनांक २० डिसेंबर २०१९ रोजी धरणे आंदोलन केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिक्षकांना वेतन अनुदान देण्याऐवजी प्रति विद्यार्थी अनुदान देणे याविषयाबाबत अभ्यास करण्यासाठी स्थापन केलेला अभ्यास गट त्वरीत रद्द करणे, जुनी पेन्शन योजना पुर्ववत लागू करणे आणि इतर १७ मागण्यांचे निवेदन शालेय शिक्षण मंत्री यांना दिले आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

प्रा. वर्षा गायकवाड (२५-०३-२०२२) : (१) व (२) होय,हे खरे आहे.

(३) व (४) आयुक्त शिक्षण यांनी दि.०४.१२.२०१९ च्या आदेशान्वये नेमलेला अभ्यासगट दि.१९.१२.२०१९ च्या आदेशान्वये रद्द करण्यात आला आहे.

संगणक निदेशकांच्या नेमणुका संबधित एजन्सीमार्फत कंत्राटी तत्वावर योजनेच्या मर्यादित कालावधीकरीता केलेल्या असल्यामुळे योजनेचा कालावधी पूर्ण झाल्यावर त्यांच्या सेवा संपुष्टात येतात.

शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचा आकृतीबंध दि.११.१२.२०२० च्या शासन निर्णयान्वये निश्चित करण्यात आला आहे.

११ वी ची ऑनलाईन प्रवेशप्रक्रिया केंद्रिय पध्दतीने राबविण्यात येते.

इतर मागण्यांच्या अनुषंगाने शासनस्तरावर कार्यवाही चालू आहे.

राज्यातील शिक्षकेत्तर कर्मचा-यांच्या प्रलंबित मागण्यांबाबत

(२) १२७२९ (१३-०९-२०२०). श्री.सुनील राणे (बोरीवली) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शिक्षकेत्तर कर्मचारी भरती,पूर्णवेळ ग्रंथपाल पद,प्रगती योजना, २४ वर्षानंतर मिळणारी निवड श्रेणी, अनुकंपा भरती, शिक्षकेत्तर व अन्य पदासाठी विनाअट पदोन्नती व वेतन संरक्षण देणे तसेच शिक्षक आमदारांना निवडून देतांना मतदानाचा अधिकार व अन्य प्रलंबित शिक्षकेतर कर्मचा-यांच्या मागण्यांबाबत शासनाने निर्णय घेतला आहे काय,

(२) असल्यास, मागील अनेक वर्षापासून प्रलंबित असलेल्या मागण्यासंदर्भात शासन स्तरावर निर्णय घेण्यास विलंब लागण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उक्त मागण्यांसदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

प्रा. वर्षा गायकवाड (२५-०३-२०२२) : (१), (२), (३) व (४) दि.२८.०१.२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांसाठी सुधारीत आकृतीबंध लागू करण्यात आला आहे. तसेच दि.११.१२.२०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांसाठी आकृतीबंध निश्चित करण्यात आला आहे. यात पूर्णवेळ ग्रंथपाल पदाचा समावेश आहे.

अनुज्ञेय पदानुसार व्यपगत होणारी, अतिरिक्त ठरणारी पदे व कार्यरत कर्मचाऱ्यांच्या अनुषंगाने समायोजनाची कार्यवाही प्रथम करणे अपेक्षित असून क्षेत्रीय स्तरावर याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना कालबध्द पदोन्नती योजना लागू आहे. २४ वर्षानंतरचा दुसरा लाभ शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना लागू करण्याचा प्रस्ताव वित्त विभागाने आर्थिक तरतूदीअभावी अमान्य केला आहे.

सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना (तीन लाभांची) लागू करण्याबाबतच्या प्रस्तावाबाबत वित्त विभागाने काढलेल्या त्रुटीच्या अनुषंगाने शिक्षण संचालक (माध्यमिक) यांचेकडून माहिती मागविण्यात येत आहे.

शिक्षक आमदारांना निवडून देताना शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना मतदानाचा अधिकार देणे ही बाब मा.भारत निवडणूक आयोगाच्या अधिकारक्षेत्रात असुन याबाबत कोणतीही मागणी विभागाच्या स्तरावर प्राप्त झाल्याचे आढळून आलेले नाही.

राज्य शासनाच्या परवानगीविना शिक्षकांची प्रशिक्षण कार्यशाळा सुरु असल्याबाबत

(३) १४५७० (१३-०९-२०२०). श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव), श्री.राजू कारेमोरे (तुमसर), श्री.इंद्रनिल नाईक (पुसद) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परीषदेने मागील काही दिवसात परीषदेच्या मान्यतेविना शिक्षकांच्या कार्यशाळा सुरु केल्याचे माहे एप्रिल, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (डायटा) व राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण संस्थेकडे शिक्षकांच्या प्रशिक्षणाची जबाबदारी दिली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार विना परवानगी शिक्षकांची प्रशिक्षण कार्यशाळा सुरू करण्यऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

प्रा. वर्षा गायकवाड (२६-०५-२०२२) :(१) हे खरे नाही.
(२) होय, हे खरे आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

पनवेल (ता.पनवेल, जि.रायगड) बस आगाराच्या नुतनीकरणाचे काम प्रलंबित असल्याबाबत

(४) ३२५२५ (१२-०१-२०२२). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईचे प्रवेशद्वार म्हणून ओळखल्या जाणा-या महत्वाच्या पनवेल (ता.पनवेल, जि.रायगड) बस आगाराच्या नुतनीकरणाच्या कामाला अद्यापपर्यंत सुरूवात झाली नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पनवेल बस आगाराच्या नुतनीकरणाच्या कामाला राज्य परिवहन महामंडळाकडून काढण्यात आलेल्या निविदा प्रक्रीयेत कुर्डुस पार्क या ठेकेदार कंपनीने सादर केलेल्या निविदेला मान्यता दिली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त कंपनीमार्फत डिसेंबर २०१८ मध्ये कामाला सुरूवात होण्याची अपेक्षा असताना शासनाकडून अद्याप मंजुरी न मिळालेल्यामुळे बस आगाराच्या नुतनीकरणाच्या कामाला विलंब होत आहे, ही गोष्ट खरी आहे काय?
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून पनवेल बस आगाराच्या नुतनीकरणाच्या कामाला तातडीने सुरूवात करण्याबाबत कोणती कार्यवाही केली तसेच केलेल्या कार्यवाहीचे स्वरूप काय आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

ॲड. अनिल परब (०२-०५-२०२२) : (१) व (२) होय.
(३) व (४) व (५) सदर कामासाठी आवश्यक विकास करार जिल्हा उपनिबंधक, अलिबाग यांच्याकडे व प्रकल्पाच्या आराखड्यांच्या मंजूरीची बाब पनवेल महानगरपालिकेकडे सादर करण्यात आलेली आहे.

पनवेल-रोहा मार्गावर राज्य परिवहन मंडळाच्या साध्या बस सुरू करण्याबाबत

(५) ३२५३० (१२-०१-२०२२). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य परिवहन मंडळाच्या पनवेल रोहा मार्गावरील साध्या बस कमी करून दीडपट्ट अधिक भाडे असलेल्या आरामदायी शिवशाही बसच्या फे-या सुरू केल्या असल्या तरी सामान्य प्रवासी, नोकरदार व विद्यार्थ्यांना शिवशाही बसचे भाडे परवड नसल्यामुळे बहुतांशी प्रवासी खाजगी वाहनांचा प्रवासासाठी वापर करत असल्याने परिवहन मंडळाला आर्थिक फटका बसत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास, जास्त नफा मिळण्यासाठी जलद प्रवास म्हणून सुरू केलेल्या शिवशाही बस प्रत्येक थांबा घेत असल्याने अधिक भाडे भरून प्रवास करणा-या प्रवासी वर्गामध्ये संतापाची लाट निर्माण होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने शिवशाही बस व्यतिरिक्त सर्वसामान्य प्रवाशांना परवडणाऱ्या साध्या बसही सुरू करण्याबाबत कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, त्याचे स्वरुप काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

ॲड. अनिल परब (०२-०५-२०२२) : (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही. प्रवाशांच्या सोयीकरीता सर्व थांबे घेतले जातात.
(३) पनवेल-रोहा मार्गावर गरजेनुसार राज्य परिवहन महामंडळाच्या साध्या बसेस चलनात आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यांच्या सीमांवरील प्रादेशिक परिवहन विभागाचे तपासणी नाके बंद करण्याबाबत

(६) ३२८२२ (१२-०१-२०२२). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ऑल इंडिया मोटार ट्रान्सपोर्ट संघटनेतर्फे केलेल्या मागणीस मान्यता देऊन राज्यासह देशभरातील एकूण १२ राज्यांच्या सीमांवर असलेले प्रादेशिक परिवहन विभागाचे तपासणी नाके बंद करण्याचे आदेश दिनांक ११ सप्टेंबर, २०२१ रोजी केंद्र शासनाकडून सर्व राज्यांना देण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महाराष्ट्र राज्यांच्या सीमांवरील प्रादेशिक परिवहन विभागाचे तपासणी नाके बंद करण्याबाबत राज्य शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, संबंधित तपासणी नाक्यावर वाहतुकदारांचा वेळ वाया जाण्याबरोबरच आर्थिक तोटा होत असल्याने केंद्र शासनाच्या आदेशानुसार उक्त तपासणी नाके तात्काळ बंद करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

ॲड. अनिल परब (२६-०५-२०२२) : (१), (२) व (३) केंद्र शासनाच्या दि. ०६ सप्टेंबर, २०२१ रोजीच्या पत्रान्वये राज्यातील सीमा तपासणी नाके बंद करण्याबाबतची सध्यस्थिती कळविण्याचे निर्देश प्राप्त झाले आहेत.
केंद्र शासनाच्या उपरोक्त निर्देशानुसार महाराष्ट्र राज्यातील सीमा तपासणी नाके बंद करणे, सदर सीमा तपासणी नाके बंद करावयाचे झाल्यास नियमानुसार काय प्रक्रिया अवलंबवावी लागेल व राज्य शासनावर त्याचा किती आर्थिक भार पडेल याचा व इतर अनुषांगिक परिणाम व उपाय योजनांच्या अभ्यासासाठी परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली अभ्यासगटाची नेमणूक करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

कुष्णूर (जि.नांदेड) पंचतारांकित एमआयडीसीतील वेंकिस इंडिया लिमिटेड कंपनीकडून प्रदुषित पाणी सोडण्यात येत असल्याबाबत

(७) ३२८८४ (१२-०१-२०२२). श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.संग्राम थोपटे (भोर) : सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदेड जिल्हयातील कुष्णूर पंचतारांकित एमआयडीसी परिसरामध्ये वेंकिस इंडिया लिमिटेड कंपनीकडून मागील काही वर्षापासून विषारी पाणी परिसरात सोडण्यात येत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यामुळे परिसरातील नागरीकांच्या आरोग्यावर वाईट परिणाम होत असल्याने या कंपनीविरुध्द अनेकवेळा तक्रारी करण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने चौकशी करुन सदर कंपनीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. आदित्य ठाकरे (१९-०४-२०२२) : (१) व (२) हे अंशत: खरे आहे.
(३) वेंकिस इंडिया लिमिटेड कंपनीमूळे होणाऱ्या जलप्रदूषणाबाबत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. सदर तक्रारींच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या पाहणीदरम्यान आढळून आलेल्या त्रुटींच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत सदर उद्योगास दिनांक ३१/१२/२०१९ रोजी प्रस्तावित निर्देश, दिनांक ०१/१०/२०२० रोजी अंतरिम आदेश व दिनांक १५/१२/२०२१ रोजी उद्योग बंद करण्याचे आदेश बजावण्यात आले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील शैक्षणिक संस्थानी शुल्कात वाढ केल्याबाबत

(८) ३३५८३ (१२-०१-२०२२). श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), ॲड.राहुल ढिकले (नाशिक पूर्व), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्रीमती श्वेता महाले (चिखली), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.सिध्दार्थ शिरोळे (शिवाजीनगर), श्री.सचिन कल्याणशेट्टी (अक्कलकोट), श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शैक्षणिक संस्थांनी सन २०२१-२०२२ मध्ये एकुण शुल्कात १५ टक्के कपातीचा निर्णय शिक्षण विभागाने घेतला असल्याचे दिनांक १३ ऑगस्ट, २०२१ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,मागील वर्षी टाळेबंदीच्या काळात अनेकांना रोजगार गमवावा लागल्यामुळे तसेच शालेय शुल्क भरण्यासाठी पालकांकडे पुरेशी रक्कम नव्हती तसेच अद्यापही २०२०-२०२१ या वर्षाचे शुल्क थकीत अाहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मागील दोन वर्षापासून शाळा बंद असताना देखील शैक्षणिक संस्थानी शुल्क वाढ केली असल्याने याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

प्रा. वर्षा गायकवाड (११-०३-२०२२) : (१) होय, दि. १२ ऑगस्ट २०२१ रोजी १५ टक्के शुल्क कपातीबाबतचा शासन निर्णय निर्गमीत करण्यात आला आहे.

(२) अंशत: खरे आहे.

(३) शासन परिपत्रक दि. ३०/३/२०२० अन्वये लॉकडाऊन कालावधीत फी जमा करण्याची सक्ती करण्यात येऊ नये असे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच शासन निर्णय दि. ८/५/२०२० अन्वये शैक्षणीक वर्ष २०२०-२१ मध्ये शुल्क एकदाच न घेता टप्प्या-टप्प्याने घेण्याबाबत सर्व शाळांना सुचित करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

नायगाव (खै) (जि.नांदेड) येथील वक्फ संस्था दर्गाहच्या जमिनीची बेकायदेशीर खरेदी-विक्री झाल्याबाबत

(९) ३३६२५ (१२-०१-२०२२). श्री.राजेश पवार (नायगांव) : सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नायगाव (खै.) (जि.नांदेड) येथील वक्फ संस्था दर्गाह तवक्कल शाहवली या दर्ग्याची जमीन बळकावल्याचे माहे एप्रिल,२०२१ मध्ये वा दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील गैरव्यवहारातील आरोपींना शासन पाठीशी घालत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणातील आरोपींची शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने बेकायदेशीर व्यवहार करणाऱ्यांवर शासनाने फसवणूकीचा फौजदारी गुन्हा दाखल केला आहे वा करण्यात आला आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. जितेंद्र आव्हाड (०७-०४-२०२२) : (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) दर्गाह तवक्कल शाहवली यांच्या मालकीच्या जमिनीचे बेकायदेशीर हस्तांतरण रद्द करण्यासाठी संबंधीतांना नोटीस बजावून उपविभागीय अधिकारी, बिलोली, जि. नांदेड यांच्याकडे सुनावणी प्रक्रिया सुरु करण्यात आली होती.
दरम्यान, मा. महाराष्ट्र वक्फ न्यायाधिकरण, औरंगाबाद येथे दाखल वक्फ अर्ज क्रमांक ०८/२०२० या प्रकरणात मा. न्यायाधिकरणाने दिनांक ७.१०.२०२० रोजी स्थगिती आदेश दिला असून प्रकरण सध्या न्यायप्रविष्ठ आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत नावीन्यपूर्ण उपक्रम म्हणून पोषक वडया दिल्या जाणार असल्याबाबत

(१०) ३३६३५ (१२-०१-२०२२). श्री.राजेश पवार (नायगांव), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत नावीन्यपूर्ण उपक्रम म्हणून पोषक वडया दिल्या जाणार आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शिक्षण संचालक श्री. दत्तात्रय जगताप यांनी सर्व जिल्हा परिषदांच्या शिक्षणाधिकारांना पोषक वड्यांच्या वितरणाबाबत परिपत्रकाद्वारे सूचना दिल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कोणत्या जिल्हयांमध्ये या उपक्रमाची सुरुवात झाली आहे तसेच याबाबत अजूनही अंमलबजावणी झाली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

प्रा. वर्षा गायकवाड (१०-०३-२०२२) : (१) व (२) हे खरे आहे.
(३) राज्यातील सर्व 35 जिल्ह्यांमध्ये या उपक्रमाची अंमलबजावणी सुरु आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील माध्यमिक शिक्षा अभियानाअंतर्गत विषयतज्ञांच्या वेतनाबाबत

(११) ३३७९२ (१२-०१-२०२२). श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.अमित झनक (रिसोड) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील माध्यमिक शिक्षा अभियाना अंतर्गत विषयतज्ञांची वेतनवाढ मागील ४ वर्षापासून दिली नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

प्रा. वर्षा गायकवाड (२८-०४-२०२२) : (१) हे खरे नाही.

माध्यमिक शिक्षा अभियानांतर्गत विषय तज्ञांची नेमणूक करण्यात आलेली नाही. तथापि प्राथमिक स्तरावर विषय साधन व्यक्ती / विषय तज्ञ ही पदे मंजूर असून सदर पदावर 6-6 महिने करार पध्दतीने कर्मचारी कार्यरत आहेत.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यातील उच्च माध्यमिक विद्‌यालयात जीवशास्त्र या विषयाअंतर्गत सुक्ष्म जीवशास्त्र हा विषय शिकविण्याची शासकीय परवानगी नसल्याबाबत

(१२) ३३८०९ (१७-०१-२०२२). श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.अमित झनक (रिसोड) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उच्च माध्यमिक विद्‌यालयात जीवशास्त्र या विषयाअंतर्गत सुक्ष्म जीवशास्त्र हा विषय शिकविण्याची शासनाकडून परवानगी नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त विषयाला जीवशास्त्र विषय शिकविण्याची परवानगी देण्यात यावी किंवा उच्च माध्यमिक विद्‌यालयीन स्तरावर सुक्ष्म जीवशास्त्र हा स्वतंत्र विषय तयार करावा यामुळे सदरहू विषयाच्या विद्‌यार्थ्यांना वैद्‌यकीय क्षेत्राकडे जाण्यास सुलभ होईल, यास्तव, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

प्रा. वर्षा गायकवाड (१२-०५-२०२२) : (१) हे खरे नाही.

(२) याबाबत प्राथमिक / उच्च प्राथमिक / माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्‌यालय / कनिष्ठ महाविद्‌यालयातील शिक्षकांची शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता निश्चित करण्याबाबतचा दि. ०७ फेब्रुवारी २०१९ या शासन निर्णयान्वये तसेच सदर शासन निर्णयाचे शुद्‌धिपत्रक दि. २५

फेब्रुवारी, २०१९ अन्वये परिशिष्ट "ड" मध्ये इयत्ता ११ वी व १२ वी (उच्च माध्यमिक स्तरासाठी) शिक्षकांची शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता देण्यात आली आहे. सदर अर्हतेमध्ये मायक्रोबायोलॉजी विषयाच्या पदवीत्तर पदवी असलेल्या उमेदवारास जीवशास्त्र विषय शिकविण्यास पात्र ठरविण्यात आले आहे.

शासन निर्णय क्रमांक संकीर्ण २०१९ / प्र.क्र. (२४३/१९) / एसडी -४, दि. ०८ ऑगस्ट, २०१९ नुसार इयत्ता ११ वी व इयत्ता १२ वी सुधारित विषय योजना व मूल्यमापन योजना निश्चित करण्यात आली आहे. त्यानुसार सुधारित अभ्यासक्रम व पाठ्यक्रमासाठी सन २०१९-२० पासून इयत्ता ११ वी साठी व सन २०२१-२२ पासून इयत्ता १२ वी साठी सुधारित विषय योजना व मूल्यमापन योजना निश्चित करण्यात आली आहे. त्यामध्ये शाखानिहाय विषयांचा संबंध लक्षात घेऊन Group A, Group B व Group C मध्ये विषयाची विभागणी करण्यात आलेली असून शाखानिहाय कनिष्ठ महाविद्यालयांनी / विद्यार्थ्यांनी विषय निवड करण्याबाबत धोरण निश्चित करण्यात आले आहे. जीवशास्त्र विषय हा विज्ञान शाखेसाठी Group B मध्ये करण्यात आलेला आहे.

सूक्ष्म जीवशास्र ही जीवशास्त्र विषयाची शाखा आहे. सूक्ष्म जीवशास्त्र अंतर्गत येणारा आशय हा विद्यार्थी वयोगट, क्षमता यांना अनुसरून इयत्तांच्या पाठ्यक्रमात समाविष्ट करण्यात आलेला आहे.

जीवशास्त्र या विषयात सूक्ष्म जीवशास्त्र विषयक माहितीचा समावेश करण्यात आला आहे. अभ्यासक्रम हा चढत्या क्रमाने असल्याने प्राथमिक रुपातून त्याच्या गहनतेकडे नेण्यात आला आहे. सूक्ष्मजीवशास्त्र ही जीवशास्त्र विषयाची उपशाखा आहे.

तरी सूक्ष्म जीव शास्त्र हा विषय विद्यार्थी वयोगट, क्षमता व इयत्तांनुसार विषयरचना लक्षात घेता स्वतंत्रपणे ठेवणे संयुक्तिक वाटत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

इगतपुरी या आदिवासी मतदार संघात (जि.नाशिक) प्रदुषण करणाऱ्या कंपन्यांवर कारवाई करण्याबाबत

(१३) ३४१७६ (१२-०१-२०२२). श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी) : सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इगतपुरी (जि.नाशिक) या आदिवासी मतदार संघात औद्योगिक वसाहती असून या वसाहतीतील कंपन्यामुळे मोठया प्रमाणात वायु, जल तसेच शेतकऱ्यांच्या शेतजमीनी प्रदूषीत होत असल्याचे माहे जून, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कंपन्यांमध्ये नियमबाह्यरित्या कामकाज होत असून येथे जाणीवपूर्वक स्थानिकांना रोजगार न देता परप्रांतियांना रोजगाराकरीता प्राधान्य देत असल्याची तक्रार नागरीकांनी स्थानिक लोकप्रतिनिधीकडे केली असून याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी याबाबत मा. राज्यमंत्री, पर्यावरण विभाग यांना माहे दिनांक १८ जून, २०२१ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कंपन्यांमुळे होणारे प्रदूषण रोखणे तसेच स्थानिकांना रोजगार मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. आदित्य ठाकरे (१९-०४-२०२२) : (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) मे. जिंदाल पॉलीफिल्म, मुडेगांव, ता. इगतपुरी जि. नाशिक या कारखान्याच्या जलप्रदूषणाबाबत प्राप्त तक्रारींच्या अनषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत सदर उद्योगाची पाहणी करण्यात आली होती. सदर पाहणीदरम्यान आढळून आलेल्या त्रुटींच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने सदर कारखान्यास दिनांक 07/09/2021 रोजी कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे.
• स्थानिक लोकप्रतिनिधींकडून कंपनीमधील प्रदूषणाबाबत तसेच स्थानिकांना रोजगार न देता परप्रांतियांना रोजगाराकरीता प्राधान्य देत असल्याबाबत मा. राज्यमंत्री (पर्यावरण व वातावणीय बदल) यांच्याकडे केलेली तक्रार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे प्राप्त झाली होती. सदर तक्रारीमध्ये नमूद कंपनीमधील प्रदूषणाच्या विषयाबाबत केलेल्या कार्यवाहीच्या अनुषंगाने मा. सदस्यांना अवगत करण्यात आले असून कंपनीमध्ये परप्रांतियांना रोजगार देण्याच्या विषयाबाबत कार्यवाही करण्याकरिता सदरहू निवेदन / तक्रार जिल्हा उद्योग केंद्र व उपायुक्त कामगार नाशिक यांच्याकडे पाठविण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

उजनी जलाशयातील पाणी प्रदुषित झाल्याबाबत

(१४) ३४४५३ (१२-०१-२०२२). श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी), ॲड.अशोक पवार (शिरुर) : सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहर, पिंपरी-चिंचवड, कुरकुंभे महाराष्ट्र औद्यागिक वसाहतीतील (जि.पुणे) अनेक केमिकल व रासायनिक कंपन्यांमधून पाण्यावर प्रक्रिया न करता सोडण्यात येणाऱ्या प्रदुषित पाण्यामुळे उजनी जलाशयातील पाण्यावर गडद हिरव्या रंगाचा तवंग निर्माण होऊन पाणी दुषित झाल्याचे दि. १२ ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत स्थानिक अधिकाऱ्यांनी शासनाकडे वारंवार अहवाल सादर करण्यात येऊनही जलप्रदुषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, दुषित मळीमिश्रित व केमिकलयुक्त पाणी धरण परिसरात सोडणाऱ्या संबंधित कंपन्यांविरुध्द कारवाई करण्याबाबत नागरीकांनी वारंवार मागणी केली असून सदर दुषित

पाण्यामुळे नागरीकांच्या आरोग्यास धोका निर्माण होणार असल्याचा अहवाल आरोग्य तज्ञांनी शासनास सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, त्याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. आदित्य ठाकरे (१९-०४-२०२२) : (१) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत उजनी धरणाच्या पाण्याची गुणवत्ता वेळोवेळी तपासली जाते. त्यानूसार उजनी धरणातील पाण्यात रासायनिक पदार्थ मिश्रीत होत असल्याचे आढळून येत नाही. तथापि, सदर पाण्यामध्ये घरगुती सांडपाण्याशी निगडीत मानके जसे की, टोटल कॉलिफॉर्म व फिकल कॉलिफॉर्म विहीत मर्यादेपेक्षा जास्त आढळून आले आहेत.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
(४) मुळा-मुठा नदी व त्याच्या उपनद्यांच्या प्रदूषणाच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत जल (प्रतिबंध व प्रदूषण नियंत्रण) कायदा, १९७४ कलम - ४१ अन्वये पुणे महानगरपालिकेची रु.१५ करोड इतकी रक्कम गोठविण्यात आली आहे. तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत पुणे महानगरपालिकेला जल (प्रतिबंध व प्रदूषण नियंत्रण) कायदा, १९७४ अन्वये दिनांक २९/१०/२०२१ रोजी आदेश देण्यात आले आहेत.
• महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत अप्रक्रीयाकृत सांडपाण्यावर प्रक्रीया करण्याकरीता मैला शुध्दीकरण प्रक्रीया संयंत्रणा उभारण्यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेला दिनांक ०९/१२/२०१९, दिनांक १५/०१/२०२० व दिनांक २९/१०/२०२१ रोजी प्रस्थावित आदेश बजावण्यात आले आहेत.
• तसेच सदर महानगरपालिकेविरुध्द जल (प्रदुषण प्रतिबंध व नियंत्रण) कायदा, १९७४ अन्वये फौजदारी खटला आर.सी.सी. नं. १४४/२००० व आर.सी.सी. नं. ७०९/२०१६ व नुकताच दावा आर.सी.सी. नं.३१६८/२०२० अन्वये मा. मुख्य दंडाधिकारी पुणे यांच्या न्यायालयात दाखल केला असून प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

शाळाबाहय विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्याबाबत

(१५) ३४४६६ (१२-०१-२०२२). श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.सहसराम कोरोटे (आमगाव) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात शाळाबाहय अनियमित व स्थलांतर मुलांना शाळेच्या प्रवाहात दाखल करण्याकरीता शासनामार्फत दिनांक १ ते १० मार्च, २०२१ या कालावधीत विशेष शोध मोहिम राबविण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, औरंगाबाद, अमरावती व बुलढाणा, पिंपरी-चिंचवड मनपा (पुणे) व नागपूर मनपा ही क्षेत्र वगळता उर्वरित जिल्हयातील प्राथमिक व माध्यमिक माध्यमातील २५ हजार २०४ विद्यार्थी शाळाबाहय असल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्याबाबतचा अहवाल प्राथमिक व माध्यमिक शिक्षण संचालक, पुणे यांनी राज्य शासनास सादर केला असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

प्रा. वर्षा गायकवाड (१०-०३-२०२२) : (१) हे खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.
आजपावेतो प्राप्त माहितीनुसार ३ ते १८ वयोगटातील २५०२२ शाळाबाह्य बालके आढळून आली आहेत. मात्र ही माहिती कोरोना काळात सर्व शाळा बंद असण्याच्या कालावधीची आहे. आता शाळा सुरू झाल्यानंतर यापैकी बहुतेक मुले शाळेत दाखल झाली असतील.
(३) हे खरे आहे.
(४) शाळाबाह्य मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याची कार्यवाही सूरु आहे. शाळा सुरू करण्यात आल्या आहेत, त्याचा मोठा परिणाम दिसणार आहे. शिक्षण विभागातील बालरक्षकांमार्फत स्थलांतरित व शाळाबाह्य मुलांचे शोध घेण्यात येत आहे.
तसेच राहिलेल्या जिल्ह्यात सर्व्हेक्षण करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

अंबाजोगाई (जि. बीड) येथे अल्पसंख्यांक मुला / मुलींचे नवीन वसतीगृह मंजूर करून निधी उपलब्ध करून देणेबाबत

(१६) ३४८०७ (१२-०१-२०२२). श्रीमती नमिता मुंदडा (केज) : सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केज (जि.बीड) विधानसभा मतदार संघातील अंबाजोगाई हे शैक्षणिक व विद्येचा वारसा असलेले शहर असून तेथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अभियांत्रिकी महाविद्यालय, कृषी महाविद्यालय तसेच अनेक शैक्षणिक संस्था असल्याने सदरहू शहर परिसरातील केज, परळी, धारूर, माजलगाव या तालुक्यातील व ग्रामीण भागातील मुले व मुली मोठ्या प्रमाणात शिक्षणासाठी येणाऱ्या अल्पसंख्यांक
मुला / मुलींचे नवीन वसतीगृह मंजूर करून निधी उपलब्ध करून देण्याबाबतचे निवेदन तेथील लोकप्रतिनिधींनी मा. अल्पसंख्यांक मंत्री यांना दिनांक १० ऑगस्ट, २०२० रोजी वा त्या सुमारास दिले आहे. हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर वसतिगृहास किती रुपयांचा निधी मंजूर केला आहे,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. जितेंद्र आव्हाड (१४-०३-२०२२) :(१) हो, हे खरे आहे.
(२) अद्यापपावेतो जिल्हाधिकारी, बीड यांचेकडून प्रस्ताव अप्राप्त असल्याने निधी मंजूर करण्याचा प्रश्नच उद्धभवत नाही.
(३) दि.३१/०१/२०२२ रोजीच्या पत्रान्वये जिल्हाधिकारी, बीड यांना अंबाजोगाई, जि.बीड येथे मुला, मुलीचे नवीन वसतीगृह इमारत बांधकामाचा सविस्तर प्रस्ताव जमीनीच्या उपलब्धतेसह (परिपूर्ण अंदाजपत्रक, आराखड्यासह) जिल्हाधिकारी कार्यालयामार्फ त तीन प्रतीत शासनास सादर करण्याबाबत कळविले आहे.
(४) अद्यापपावेतो जिल्हाधिकारी, बीड यांचेकडून प्रस्ताव अप्राप्त आहे.

अल्पसंख्यांक तरुणांसाठी पोलीस भरतीमध्ये संधी देण्याकरीता प्रशिक्षण केंद्र सुरु करण्याबाबत

(१७) ३५००१ (१२-०१-२०२२). श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) : सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अल्पसंख्यांक तरुणांसाठी पोलीस भरती मध्ये संधी देण्यासाठी भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्र सुरु करणार आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आजपर्यंत एकुण किती अल्पसंख्याक तरुणांनी प्रशिक्षण केंद्राचा लाभ घेतला आहे,
(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. जितेंद्र आव्हाड (२५-०३-२०२२) : (१) हे खरे आहे.
(२) व (३) राज्यातील अल्पसंख्यांक उमेदवारांचे पोलीस भरतीमधील प्रमाणात वाढ व्हावी याकरीता शासन निर्णय दि. २७/०७/२००९ अन्वये पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षण योजना राबविण्यात येत आहे. या योजनेंतर्गत सन २००९-१० ते सन-२०२०२-२१ या वर्षामध्ये एकूण-२२,२९४ उमेदवारांनी प्रशिक्षणाचा लाभ घेतला आहे. तसेच शासन निर्णय दि.१७/१२/२०२१ अन्वये सदर योजनेत सुधारणा करण्यात आली असून ही योजना निवासी करण्यात आली आहे तसेच प्रशिक्षण कालावधी दोन महिन्यांएवजी तीन महिने करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

नाशिक येथील नदीपात्रात रसायनमिश्रित पाणी सोडणाऱ्या कंपन्यांवर कारवाई करण्याबाबत

(१८) ३५०५६ (१२-०१-२०२२). श्री.दिलीपराव बनकर (निफाड) : सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक येथील औद्यागिक वसाहतीतील सुमारे १५ कंपन्या नासर्डी व गोदावरी नदीत रसायनमिश्रित पाणी सोडत असल्याचे माहे जून, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर १५ कंपन्यांवर पर्यावरण विभागाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंब होण्याची कारणे काय आहेत ?

श्री. आदित्य ठाकरे (१९-०४-२०२२) : (१) हे खरे नाही.

(२) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिलेल्या संमतीपत्रातील अटी व शर्तीनूसार महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, अंबड व सातपूर येथील १५ उद्योग औद्योगिक प्रक्रियाकृत सांडपाण्याचा पूर्णपणे पुनर्वापर करित नसल्याने सदर उद्योगांना महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिनांक २६/०७/२०२१ रोजी उत्पादन बंदचे आदेश देण्यात आले होते.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

बीड जिल्हा पुरवठा विभागात अधिकारीव कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत

(१९) ३५१७३ (१२-०१-२०२२). श्री.संदिप क्षिरसागर (बीड) : सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्ह्यातील जिल्हा पुरवठा विभागात अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या जागा अनेक दिवसांपासून रिक्त असल्यामुळे जिल्ह्याच्या धान्य पुरवठा प्रक्रियेवर विपरीत परिणाम होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्ह्यातील शिधावाटप (स्वस्तधान्य) दुकानदारांनी जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांकडे त्यांचे परमिट सादर करुन तीन महिने होऊनही त्यांचे परमिट अधिकाऱ्यांअभावी अद्याप मंजूर करण्यांत आले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रिक्त पदे व अधिकाऱ्यांच्या गैरहजेरीमुळे दुकानदारांना धान्य मिळण्यास व वाटप होण्यास विलंब होत असल्याचे दि. २७ ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, परिणामी ऐन दिवाळी सणाच्या काळात लाभार्थी धान्यापासून वंचित रहात असल्याने बीड जिल्हा पुरवठा विभागात अधिकारी व कर्मचाऱ्यांची पदे तातडीने भरुन लाभार्थ्यांना नियमित धान्यपुरवठा होण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. छगन भुजबळ (२२-०४-२०२२) : (१) हे अंशतः खरे आहे.

जिल्हा पुरवठा अधिकारी, सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी तसेच जिल्हा पुरवठा तपासणी अधिकारी हे पद भरण्यात आले आहे. जिल्हा पुरवठा कार्यालय बीड विभागात लिपिकांची १० पदे तर गोदाम रक्षकाचे ८ पदे रिक्त आहेत. बीड तालुक्यातील तहसिलदार व नायब तहसिलदार (पुरवठा) हे रजेवर असल्याने सदर पदभार इतर अधिका-यांकडे अतिरिक्त स्वरुपात सोपविण्यात आला आहे..

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.
(४) बीड जिल्हयातील पुरवठा विभागातील प्रश्न भाग-१ च्या उत्तरात नमूद केल्यानुसार जिल्हा पुरवठा अधिकारी, सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी तसेच जिल्हा पुरवठा तपासणी अधिकारी ही पदे भरण्यात आली आहेत. उर्वरित रिक्त पदांचा अतिरिक्त कार्यभार समकक्ष अधिकारी /कर्मचारी यांचेकडे सोपवून पुरवठा विषयक कामकाज सुरळीत पाड पाडले जात आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

पुरंदर (जि.पुणे) घाटमार्गावरील निसर्ग व पर्यावरणाला बाधा आणणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत

(२०) ३५३६४ (१२-०१-२०२२). श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा) : सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुरंदर (जि.पुणे) येथील सर्वच घाटमार्गावर स्थानिक व शहरी बेजबाबदार नागरीकांनी ठिकठिकाणी केमिकल्स, औषधे, काचा, वैद्यकीय कचरा व टाकाऊ अन्नपदार्थ टाकल्यामुळे येथील निसर्गसौंदर्य तसेच नागरीकांचे आरोग्य धोक्यात आले असल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने निसर्ग व पर्यावरणाला बाधा आणणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. आदित्य ठाकरे (२६-०४-२०२२) :(१) अंशत: खरे आहे.
(२) जिल्हा परिषद, पुणे यांच्याकडून प्राप्त माहितीनुसार घाटमाथ्याच्या आजूबाजूच्या परिसरातील नागरिकांकडून विविध प्रकारचा कचरा टाकण्यात येत असल्याने संबंधित ग्रामपंचायतीस कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासंदर्भात व कचरा टाकणाऱ्या नागरिकांवर योग्य ती कारवाई करण्यासंदर्भात जिल्हापरिषद, पुणे कडून कळविण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

उल्हासनगर मधील दिव्यांग व्यक्तींना अंत्योदय शिधापत्रिकांचा लाभ मिळण्यासाठी इस्टांक वाढवून देण्याबाबत

(२१) ३५३९१ (१२-०१-२०२२). श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर) : सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य सरकार ने दिलेल्या निर्देशाप्रमाणे उल्हासनगर ४० फ उप मधील दिव्यांग

व्यक्तींना अंत्योदय शिधापत्रिका देण्यांत आल्या परंतु इस्टांक कमी असल्याने त्यांना मागील तीन महिन्यापासून धान्य देण्यात आले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शिधापत्रिका प्राप्त दिव्यांगांना धान्य उपलब्ध होण्याच्यादृष्टीने शिधापत्रिकांचा इस्टांक वाढवून देण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी मा. अन्न पुरवठा मंत्री यांच्याकडे दिनांक ३/९/२०२१ रोजी केली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, शिधावाटप कार्यालय ४० फ उप यांनी शासनाकडे पत्र क्र .४० फ उप /शिप /२०२१/कवि ६६ नुसार दिनांक २२/७/२०२१ रोजी उपनियंत्रक ठाणे यांना कळविले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने ४० फ उप मधील दिव्यांग व्यक्तींना धान्य उपलब्ध होण्यासाठी अंत्योदय शिधापत्रिकाचा इस्टांक वाढून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. छगन भुजबळ (१०-०३-२०२२) : (१) हे खरे नाही
(२) व (३) होय
(४) दि. १८.२.२०२२ च्या शासन निर्णयान्वये शिधापत्रिका व्यवस्थापन प्रणाली (RCMS) वरील माहितीच्या आधारे राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत सुधारीत जिल्हानिहाय इष्टांक देण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही

आहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापिठाकडून घेण्यात आलेल्या अभियांत्रिकीच्या परिक्षेच्या निकालाबाबत

(२२) ३५५४७ (१२-०१-२०२२). श्री.समाधान अवताडे (पंढरपूर), श्री.विजयकुमार देशमुख (सोलापूर शहर उत्तर) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापिठाकडून सन २०२१ मध्ये घेण्यात आलेल्या अभियांत्रिकीच्या परिक्षेचा निकाल लागून ६५ दिवसानंतरही गुणपत्रिका उपलब्ध न झाल्याने एकुण ५०० विद्यार्थ्यांची महाविद्यालयाच्या प्लेसमेटद्वारे निवड होवूनही नोकरी पासून वंचित रहावे लागल्याचे माहे सप्टेंबर २०२१ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत छापिल गुणपत्रिका न देणाऱ्यांवर शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. उदय सामंत (१४-०३-२०२२) : (१) व (२) हे खरे नाही.

विद्यापीठाच्या अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या परीक्षा दि.१० जुलै, २०२१ ते दि.२५ जुलै, २०२१ या कालावधीत घेण्यात आल्या असून विद्यापीठाने २७ दिवसांच्या आत परीक्षेचा निकाल ऑनलाईन पध्दतीने दि.२१ ऑगस्ट, २०२१ रोजी लावला आहे. सर्व संबंधित महाविद्यालयांना दि.२४ सप्टेंबर, २०२१ रोजी सदर परीक्षेच्या संदर्भात गुणपत्रिका लवकरात लवकर घेऊन जाण्यासाठी ईमेलद्वारे कळविण्यात आले होते. विद्यापीठाच्या परीक्षा विभागाने प्रस्तुत परीक्षेचा निकाल प्रसिध्द झाल्यापासून ३४ दिवसांत गुणपत्रिका तयार करुन महाविद्यालयांना पाठविण्याची कार्यवाही वेळेत पूर्ण केली आहे.

तसेच, विद्यापीठ व महाविद्यालय स्तरावर परीक्षा पार पडत असताना तांत्रिक अडचणीमुळे ऑनलाईन परीक्षेपासून वंचित राहिलेल्या विद्यार्थ्यांसाठी सत्र अखेर विशेष परीक्षा घेण्यात आल्या असून सदर परीक्षेचा निकाल तातडीने विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आला आहे. अभियांत्रिकी विद्यार्थ्यांच्या प्लेसमेंटच्या दृष्टीने विद्यार्थ्यांचे हित लक्षात घेऊन त्यांना गुणपत्रक व प्रोव्हिजनल पासींग सर्टीफिकेट उपलब्ध करुन देण्यात आले आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

झोडगा (ता.मलकापुर, जि. बुलढाणा) येथील नदी (छोट्या नाला) मध्ये दूषित केमिकल पाण्यात मिसळल्याने जनावरे व नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण झाल्याबाबत

(२३) ३५६३९ (१२-०१-२०२२). श्री.राजेश एकडे (मलकापूर) : सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) झोडगा (ता.मलकापुर, जि.बुलढाणा) येथील नदीमध्ये मलकापूर येथील चैतन्य केमिकल प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीचे दूषित केमिकल पाण्यात मिसळल्याने जनावरे व स्थानिक नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी तलाठी, झोडगा यांनी दिनांक २९/०७/२०२० रोजी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने तहसील कार्यालय मलकापूर यांनी स्थळ निरीक्षण करून प्रदूषण नियंत्रण मंडळ, अकोला यांना चौकशी करण्याबाबत कळविले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने चैतन्य केमिकल्स प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीवर कोणती कार्यवाही केली, केलेल्या कारवाईचे स्वरूप काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

श्री. आदित्य ठाकरे (२२-०४-२०२२) : (१) हे खरे नाही.
(२) तलाठी, झोडगा यांनी दि. २९/०७/२०२० रोजी मौजे झोडगा, ता. मलकापूर येथील नदी / छोट्या नाल्याचे पाणी प्रदूषित झाल्याबाबत केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने तहसिलदार, मलकापूर यांच्यास्तरावर तलाठी, झोडगा, सरपंच व इतर रहीवाशांसह नायब तहसीलदार मलकापुर यांनी दि. ११/०९/२०२० रोजी स्थळ पाहणी करून पंचनामा केलेला होता. तथापि, याबाबतचा अहवाल तहसिल कार्यालय, मलकापूर यांच्याकडून महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे प्राप्त झाला नव्हता.

(३) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत मे. चैतन्य केमिकल्स उद्योगास दिनांक ३०/११/२०२१ रोजी देण्यात आलेल्या भेटीमध्ये सदर उद्योग संमतीपत्रातील अटी व शर्तींचे अनुपालन करीत नसल्याचे निदर्शनास आल्याने सदर उद्योगास दिनांक ०१/१२/२०२१ रोजी समज पत्र व दिनांक १६/१२/२०२१ रोजी उद्योग बंद का करण्यात येवु नये? अशा आशयाची कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील शालेय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या फी संदर्भात स्थापन केलेल्या शुल्क नियामक समित्यांबाबत

(२४) ३५८८२ (१२-०१-२०२२). श्री.चेतन तुपे (हडपसर) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शालेय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या फी संदर्भात पालकांनी केलेले तक्रारीचे निरसन करण्यासाठी महाराष्ट्र शैक्षणिक विनियमन अधिनियमातील तरतूदीनुसार पुणे, मुंबई, नाशिक, नागपूर व औरंगाबाद याठिकाणी विभागीय शुल्क नियामक समित्यांची स्थापना माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्या दरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

प्रा. वर्षा गायकवाड (०२-०५-२०२२) : (१) अशंत: खरे आहे.
शासन अधिसुचना दिनांक ७ जुन, २०२१ अन्वये विभागीय शुल्क नियामक समित्यांचे गठण करण्यात आले आहे.
(२) संबंधित शिक्षण सहसंचालक/उपसंचालक तथा पदसिध्द सदस्य सचिव, पूनरिक्षण समिती व विभागीय शुल्क नियामक समिती यांना समित्यांचे कामकाज सुरु करण्याबाबत सुचना देण्यात आल्या आहेत, तसेच शासन निर्णय दिनांक १४ जुलै २०२१ अन्वये कोल्हापूर, अमरावती, व लातूर, या विभागांचा अतिरीक्त कार्यभार अनुक्रमे पुणे, नागपूर, व औरंगाबाद येथील विभागीय शुल्क नियामक समित्यांकडे सोपविण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

सोलापूर शहरांमध्ये ऐन सणासुदीत मध्ये खासगी ट्रॅव्हल्स व्यवसायिकांनी प्रवाशांना अधिक दराने तिकिटाची विक्री केल्याबाबत

(२५) ३६०६६ (१२-०१-२०२२). श्री.विजयकुमार देशमुख (सोलापूर शहर उत्तर), श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.सिध्दार्थ शिरोळे (शिवाजीनगर) : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राजापूर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील एसटीच्या कांही बस फे-या अचानक दिवाळी या सणाच्या काळात बंद केल्याने माहे नोव्हेंबर, २०२१ मध्ये तसेच सोलापूर शहरात खासगी

ट्रॅव्हल्स व्यवसायिकांनी प्रवाशांना जादा दराने तिकीट विक्री करून प्रवाशांची आर्थिक लूट केल्याचे दिनांक २३ ऑगस्ट, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील परिहवन महामंडळाच्या कर्मचाऱ्यांनी अचानक संप केल्याने विद्यार्थी व इतर प्रवाशांना जादा भाडे देऊन खाजगी वाहनाने प्रवास करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, परिवहन महामंडळाच्या कर्मचाऱ्यांचा संप मोडीत काढण्यासाठी राज्य परिवहन महामंडळाने शिवशाही बसचे तिकीट पुणे येथून अहमदनगरला जाणाऱ्या प्रवाशांना औरंगाबादचे तिकीट काढण्याची सक्ती करून त्यांची आर्थिक फसवणूक केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने अधिक भाडे आकारुन प्रवाश्यांचे आर्थिक पिळवणूक करणाऱ्या खाजगी ट्रॅव्हल्स तसेच आगारातील मनमानी कारभार करणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहेत ?

ॲड. अनिल परब (१९-०५-२०२२) : (१) व (२) अशा आशयाची बातमी दैनिक दिव्य मराठा, सोलापूर शहर या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध झाली आहे.

राजापूर तालुक्यातील शाळांना दिवाळी सुट्टी असल्याने आगारामार्फत चालविण्यात येणा-या ५८ शालेय फे-या पूर्व नियोजित बंद ठेवण्यात आलेल्या होत्या. तसेच माहे नोंव्हेबर २०२१ मध्ये कर्मचा-यानी अचानक कामबंद आंदोलन पुकारल्यामुळे राजापूर आगारातील बसेस मार्गस्त झाल्या नाहीत.

परिवहन महामंडळाच्या संप काळात शासनाने सर्व प्रकारच्या प्रवासी वाहनांना प्रवाशांची वाहतूक करण्यासाठी दि.०८.११.२०२१ च्या अधिसुचनेद्वारे परवानगी दिली आहे. तसेच नागरिकांकडून संप काळात जादा प्रवासी भाडे आकारले जावू नये, म्हणून कारवाई करण्याबाबत सर्व क्षेत्रिय परिवहन कार्यालयांना सूचित केले आहे.
(३) रा.प पुणे विभागातील शिवाजीनगर बसस्थानकातून पुणे ते औरंगाबाद या मार्गावर विनावाहक शिवनेरी व शिवशाही बससेवा ठोक प्रवासभाडे पदधतीने तिकीट आकारणी करून कायमस्वरूपी चालविण्यात येत आहेत. त्यामध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही.
(४) व (५) परिवहन आयुक्त कार्यालयाने दि.२०.१०.२०२१ च्या पत्रान्वये सर्व प्रादेशिक परिवहन अधिकारी व उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांना खासगी वाहतुकदारांनी निर्धारित करण्यात आलेल्या दरापेक्षा अधिक दर आकारल्यास सदर वाहतूकदारावर कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार दि.२०.१०.२०२१ ते दि.३१.०१.२०२२ या कालावधीत ७६१९ वाहने तपासण्यात आली असुन सदर प्रकरणी कर स्वरुपात रु.०.४३ लाख व दंडापोटी रु. १.७९ लाख अशी एकूण रु.२.२२ लाख रक्कम शासनखाती जमा करण्यात आलेली आहे.

वसई-विरार येथे प्लास्टिक पिशव्यांच्या वापर होत असल्याबाबत

(२६) ३६३०६ (१२-०१-२०२२). श्री.शिरीष चौधरी (रावेर) : सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई-विरार महानगरपालिकेने सन २०१८ मध्ये शहरात प्लास्टिकवर बंदी आणली असली तरी शहरात पुन्हा प्लास्टिक पिशव्यांचा वापर वाढला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहरात प्लास्टिक पिशव्यांना बंदी असताना वसई विरारमध्ये अवैध मार्गाने प्लास्टिक पिशव्या आणून त्याचा वापर होत असल्याने पर्यावरणाला धोका निर्माण झाला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित अधिकाऱ्यांनी याची नोंद घेऊन प्लास्टीक पिशव्यांवर बंदी घालण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. आदित्य ठाकरे (२६-०४-२०२२) : (१) नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भ्वत नाही.

राज्यात शिधावाटप पॉज मशिनमधील तांत्रिक बिघाडामुळे
धान्य वाटपात अडचणी निर्माण झाल्याबाबत

(२७) ३६३४६ (१२-०१-२०२२). श्री.राजन साळवी (राजापूर) : सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ग्राहकांना आधुनिक पध्दतीने शिधावाटप करण्याकरीता अन्न नागरी पुरवठा विभागाने रेशन दुकानदारांना पॉज मशिन दिले आहे परंतु या मशिनमधील वारंवार होणाऱ्या तांत्रिक बिघाडामुळे दुकानदार व ग्राहक त्रस्त झाले असल्याचे माहे नोव्हेंबर, २०२१ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सतत पॉज मशिन बिघडत असल्याने दुकानदारांना ग्राहकांच्या रोषाला सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. छगन भुजबळ (११-०५-२०२२) : (१) व (२) राज्यात सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे संगणकीकरण प्रकल्पांतर्गत रास्तभाव दुकानातून पात्र लाभार्थ्यांची ई-पॉसद्वारे बायोमेट्रिक ओळख पटवून अन्नधान्याचे वितरण करण्यात येत आहे. ई पॉस मशीनमध्ये तांत्रिक बिघाड झाल्यास ई पॉस मशीन पुरवठा करणाऱ्या System Integrators कडून नेमण्यात आलेल्या

तांत्रिक मनुष्यबळांमार्फत वेळेत त्या दुरुस्त करुन देण्याची कार्यवाही करण्यात येते. तसेच रास्तभाव दुकानांत नवीन ई-पॉस मशीन बसविण्याकरिता विभागामार्फत कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

नागपूर शहरातील निकषामध्ये न बसणाऱ्या शिवथाळी भोजन केंद्राचे वाटप रद्द करण्याबाबत

(२८) ३७४१७ (१२-०१-२०२२). श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) : सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर शहरातील शिवथाळी भोजन केंद्र मंजूर करण्याच्या प्रक्रियेची सखोल चौकशी करुन निकषामध्ये न बसणाऱ्या शिवथाळी भोजन केंद्राचे वाटप रद्द करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २० ऑक्टोबर, २०२१ रोजी मा.अन्न नागरी पुरवठा मंत्री यांना निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. छगन भुजबळ (२०-०४-२०२२) : (१) होय.
(२) सदर निवेदनाच्या अनुषगाने तपासणी करण्यात आलेली असून नागपूर शहरातील शिवथाळी भोजन केंद्र मंजूर प्रक्रियेत कोणत्याही प्रकारचा गैरप्रकार झाल्याचे आढळून आले नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

कोल्हापूर येथील राजाराम महाविद्यालयामध्ये संस्कृत विभाग पुनर्जिवीत करण्याबाबत

(२९) ३७६४१ (१७-०१-२०२२). श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर जिल्हयातील शिवाजी विद्यापीठ तसेच अन्य महाविद्यालयात संस्कृत विभाग उपलब्ध नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संस्कृत विषयाबाबत उच्च शिक्षणाच्या कोणत्याही सुविधाही उपलब्ध नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राजाराम महाविद्यालयामध्ये संस्कृत विभाग पुनर्जिवीत करण्याबाबत मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण,पुणे यांना सदर महाविद्यालयातर्फे दिनांक १५ डिसेंबर,२०२० रोजी वा त्या सुमारास पत्र दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. उदय सामंत (१०-०३-२०२२) : (१) होय.

(२) हे खरे नाही. शिवाजी विद्यापीठाच्या बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ज्ञान स्त्रोत केंद्र येथे संस्कृत विषयाची ग्रंथसंपदा विपुल प्रमाणात उपलब्ध आहे.

(३) राजाराम महाविद्यालय कोल्हापूर यांनी दि. १०.०२.२०२२ च्या पत्रान्वये, कोल्हापूर जिल्हा सांप्रदायिक वारकरी मंडळाचे राजाराम महाविद्यालयात संस्कृत विभाग पुनर्जिवित करण्याबाबतचे निवेदन संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांना पाठविले आहे.

(४) उपरोक्त प्रकरणी उच्च शिक्षण संचालनालयाने महाविद्यालयाकडून सविस्तर प्रस्ताव मागविला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील गरजू विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके नोंदणी प्रत्यक्ष पटसंख्येवर उपलब्ध करुन देण्याबाबत

(३०) ३७७९० (३१-०३-२०२२). श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.सचिन कल्याणशेट्टी (अक्कलकोट), श्री.संभाजी पाटील-निलंगेकर (निलंगा), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.संजय पोतनीस (कलिना), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.योगेश सागर (चारकोप), श्रीमती मंदा म्हात्रे (बेलापूर), श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती लताबाई सोनवणे (चोपडा), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय स्थानिक स्वराज्य संस्था आणि खाजगी अनुदानित शाळांतील पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी समग्र शिक्षा अभियानांतर्गत मोफत पाठ्यपुस्तक योजना कार्यान्वित असून या सुविधांचा उपयोग अनेक गरजु विद्यार्थ्यांना होत असला तरी मागील २ ते ३ वर्षांपासून अनेक लाभार्थी विद्यार्थी या योजनेपासून वंचित राहत असल्याचे माहे जानेवारी, २०२२ वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, समग्र शिक्षण अभियानांतर्गत विद्यार्थ्यांना मिळणा-या मोफत पाठ्यपुस्तकांची मागणी ही केवळ यु-डायस सांख्यिकीय माहितीच्या आधारे ऑनलाईन नोंद माहितीवर मर्यादित न ठेवता प्रत्यक्ष पटसंख्येच्या आधारे सुविधा द्यावी अशी मागणी शिक्षक आणि पालकांकडून होत असल्याचे निदर्शनास आले आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अनेक शाळांत पुन्हा पट्यसंख्या वाढत असून मात्र यापुर्वी शाळा पोर्टलवर नोंदविलेली पटसंख्या आता प्रत्यक्षात वाढली असल्याने आणि त्याप्रमाणात पाठयपुस्तके प्राप्त होत नसल्याने अनेक विद्यार्थी पुस्तकापासून वंचित राहत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, नोंदणी करावयाच्या मुदतीनंतर ऑफलाईन मागणी करण्याची कोणतीही सुविधा नसल्याने शालेय सत्र सुरु झाल्यानंतर अनेक विद्यार्थी पाठयपुस्तकापासून वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

प्रा. वर्षा गायकवाड (२०-०५-२०२२) : (१) हे खरे नाही.
(२) हे खरे आहे.
(३) हे खरे नाही.
(४), (५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

रायगड जिल्हयातील आंबा पिक विमा हप्प्त्याची रक्कम ७० रुपये वरुन २९४ रुपये करण्याबाबत

(३१) ३८१९५ (०१-०४-२०२२). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोकणात गत दोन वर्षापासून अतिवृष्टी, चक्रीवादळ तसेच कोरोनाचा प्रादूर्भाव मुळे आंबा बागायतदारांवर अर्थिक संकट ओठवले असतांना रायगड जिल्हयातील आंबा पिक विमा हप्त्याची रक्क्म रु.७० वरुन रु.२९४ करण्यात आल्यामुळे हजारो आंबा उत्पादक शेतकऱ्यांवर अन्याय झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधी व आंबा उत्पादक शेतकऱ्यांनी मा.मंत्री महोदयांना दिनांक १६ नोव्हेंबर, २०२१ रोजी पत्रव्यवहार केला आहे हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर आंबा पिक विमा हप्त्याची रक्कम वाढविण्यामागच्या कारणांची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?
श्री. दादाजी भुसे (२६-०५-२०२२) : (१) हे खरे नाही

पुर्नरचित हवामान आधारित फळपिक विमा योजना कर्जदार व बिगर कर्जदार शेतकऱ्यांना ऐच्छिक असून शेतकऱ्यांनी अधिसूचित फळपिकांचे हवामान धोके व शेतकरी विमा हप्ता याबाबत सविस्तर माहिती घेऊनच विमा योजनेमध्ये सहभागी होणेबाबत आवाहन कृषि विभागामार्फत शेतकऱ्यांना करण्यात आले आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) केंद्र शासनाच्या सुधारित मार्गदर्शक सुचनांनुसार पुर्नरचित हवामान आधारित फळपिक विमा योजना मृग बहार सन 2020 पासून कर्जदार व बिगर कर्जदार शेतकऱ्यांसाठी ऐच्छिक करण्यात आली आहे. तसेच केंद्र शासन कोरडवाहू जिल्ह्यांना 30 टक्के व बागायती जिल्हयांना 25 टक्केच्या मर्यादेत त्यांचा समप्रमाणातील हिस्सा अदा करणार आहे. या योजनेतंर्गत अधिसुचित सर्व जिल्हे हे कोरडवाहू असल्याने राज्याला 30 टक्के मर्यादा लागू

आहे. केंद्र शासनाने ज्याप्रमाणे विमा हप्ता रकमेतील महत्तम मर्यादा 12.50 टक्के निश्चित केली आहे. त्याचप्रमाणे राज्य शासनानेही विमा हप्ता रकमेतील महत्तम मर्यादा निर्धारित करुन 30 ते 35 टक्के पर्यंतचे अतिरिक्त ५ टक्के विमा दायित्व स्विकारुन 35% च्या वरील विमा हप्ता राज्य शासन व शेतकरी यांनी प्रत्येकी 50: 50 टक्के प्रमाणे भरावयाचा आहे. यापुर्वी सन 2020-21 पर्यंत विमा दरामध्ये शेतकऱ्यांना फळपिकनिहाय प्रति हेक्टरी विमा संरक्षित रक्कमेच्या ५ टक्के किंवा वास्तवदर्शी दर या पैकी जी रक्कम कमी असेल ती रक्कम विमा हप्ता म्हणून शेतकऱ्यांना भरावी लागत होती. सन 2021-22 मध्ये 35 टक्के किंवा त्यापेक्षा कमी विमा हप्ता दर प्राप्त झालेल्या फळपिकांसाठी शेतकऱ्यांनी भरावयाच्या विमा हप्ता दर 5 टक्के आहे मात्र काही फळपिकांसाठी काही जिल्हयांमध्ये 35 टक्के पेक्षा आधिक विमा हप्ता दर प्राप्त झाल्यामुळे शेतकऱ्यांनी भरावयाच्या विमा हप्ता दरामध्ये वाढ झालेली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषदेकडून घेण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती परिक्षा बाबत

(३२) ३८२८० (०१-०४-२०२२). श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्रीमती सरोज आहिरे (देवळाली), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.यशवंत माने (मोहोळ), श्री.शेखर निकम (चिपळूण), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.सचिन कल्याणशेट्टी (अक्कलकोट), श्री.संभाजी पाटील-निलंगेकर (निलंगा), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.सिध्दार्थ शिरोळे (शिवाजीनगर), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट), श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा), ॲड.राहुल ढिकले (नाशिक पूर्व), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषदेकडून इयत्ता पाचवी व आठवी ची शिष्यवृत्ती परिक्षा घेण्यात येत असून या परिक्षेत राज्यातील शासकीय, अनुदानित, विनाअनुदानित व इंग्रजी माध्यमाच्या खाजगी शाळांचा समावेश करण्यांत येतो हे खरे आहे काय,
(२) असल्यास, परिक्षा परिषदेकडून जाहीर होणाऱ्या गुणवत्ता यादीमध्ये खाजगी शाळांमधील विद्यार्थ्यांचाही समावेश असतो हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, परिक्षा उत्तीर्ण करुनही खाजगी शाळेतील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती नाकारण्यात येते हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, खाजगी शाळेतील उत्तीर्ण विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

प्रा. वर्षा गायकवाड (२७-०४-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.
(२), (३), व (४) शासन निर्णय दि.२२.०७.२०१० तसेच दि. १५.११.२०१६ नुसार महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषदेकडून घेण्यात येणाऱ्या इ.५ वी व इयत्ता ८ वी च्या शिष्यवृत्ती परिक्षेकरिता शासनमान्य (शासकीय /अनुदानित /विनाअनुदानित /कायम विनाअनुदानित / स्वयंअर्थसहाय्यित) शाळांमधील सर्व विद्यार्थी पात्र असतात.
महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांचा अभ्यासक्रम शिकविणाऱ्या मान्यताप्राप्त शाळांमधील शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीची रक्कम दिली जाते. सीबीएसई/आयसीएसई अभ्यासक्रम राबविणाऱ्या शाळांतील विद्यार्थी गुणवत्ता यादीत आल्यास पहिल्या ५० विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र दिले जाते व त्यांना गुणानुक्रम कळविण्यात येतो.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील शहरी भागात अमृत योजना २ सुरु करण्याबाबत

(३३) ३८५७५ (०९-०४-२०२२). श्रीमती सुलभा खोडके (अमरावती) : सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील ग्रामीण भागात पाणी पुरवठयासाठी केंद्र व राज्यशासनाच्या संयुक्त विद्यमाने जलजीवन मिशन सुरु आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील ५५ टक्के शहरी भागासाठी अमृत योजना २ सुरु करण्यासाठी राज्यशासन विचाराधीन आहे काय,
(३) नसल्यास, त्यामागील सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

श्री. गुलाबराव पाटील (११-०५-२०२२) : (१) पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या दि.04.09.2020 रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्यातील ग्रामीण भागात केंद्र शासन पुरस्कृत जल जीवन मिशन राबविण्यात येत आहे. जल जीवन मिशन अंतर्गत राज्यातील सर्व ग्रामीण कुटुंबांना वैयक्तिक नळ जोडणीद्वारे सन 2024 पर्यंत शुध्द व शाश्वत पेयजल उपलब्ध करुन देण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे.
(२) व (३) केंद्र शासनामार्फत अमृत 2.0 बाबतच्या मार्गदर्शक सूचना जाहीर करण्यात आलेल्या आहेत. सदर मार्गदर्शक सूचनांस अनुसरुन राज्यातील शहरी भागात अमृत 2.0 अभियानाची धोरणनिश्चिती करण्याबाबत शासनस्तरावर नगरविकास विभागामार्फत कार्यवाही सुरु आहे.

जळगाव जिल्हा परिषदे मार्फत शालेय पोषण आहारात झालेला गैरव्यवहार

(३४) ३९३९३ (०१-०४-२०२२). श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगाव जिल्हा परिषदेमार्फत शालेय पोषण आहार सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षामध्ये साई मार्केटिग ॲन्ड ट्रेडींग कंपनी कडून ७६९ मेट्रीक टन पैकी फक्त ६३२ मेट्रीक टन तांदळाचा पुरवठा केलेला असून कमी तांदळाच्या पुरवठयाबाबत दंड आकारण्यात आलेला नसल्याची बाब माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संबंधित गैरव्यवहारप्रकरणी दोषी आढळणाऱ्या व्यक्तींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

प्रा. वर्षा गायकवाड (११-०५-२०२२) :(१) तांदूळ व धान्यादी मालाच्या पुरवठ्यासंदर्भातील अनियमिततेबाबत सदर संस्थेवर शिक्षण संचालक (प्राथ.) यांनी रु.६२,२७,१७१/- इतका दंड आकारण्यात आला आहे.
(२) संबंधित दोषी गटशिक्षणाधिकारी व अधिक्षक (शालेय पोषण आहार) यांचे एक वेतनवाढ एक वर्षासाठी तात्पुरते बंद करण्याचे आदेश संबंधित मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिले आहेत. तसेच, संबंधित मुख्याध्यापक यांच्यावर कारवाई प्रस्तावित आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

स्वच्छ भारत मिशन अंतर्गत ग्रामीण भागात शौचालयाचे सेप्टीटॅंक उपसण्याची यंत्रणा नसल्याबाबत

(३५) ३९५६२ (०९-०४-२०२२). श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी) : सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील ग्रामीण भागात स्वच्छ भारत मिशन अंतर्गत शौचालये बांधण्यात आली परंतु त्यातील मैला उपसून सेप्टीटॅंक रिकामे करण्यासाठी वाहन व्यवस्था नसल्याने ही शौचालये वापराविना पडून असल्याने नागरीकांची गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ग्रामीण भागातील नागरीकांची गैरसोय लक्षात घेवून सेप्टीटॅक उपसा करण्यासाठी पंचायत समिती स्तरावर उपसा वाहन टॅंकरची सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली वा करण्यात येणार आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गुलाबराव पाटील (२६-०५-२०२२) :(१) व (२) केंद्र पुरस्कृत स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) ही योजना पाणी पुरवठा व स्वच्छता विभागामार्फत केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनानुसार राज्यातील ग्रामीण भागात राबविण्यात येते. सदर योजनेमधील घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापना अतंर्गत मैला गाळ व्यवस्थापन ही बाब अंतर्भूत आहेत.

स्वच्छ भारत अभियान (ग्रा) अंतर्गत शौचालय नसलेल्या कुटुंबांनी दोन शोषखड्डयांचे शौचालय बांधणे अनिवार्य करण्यात आले आहे. परंतु, ज्या ठिकाणी भौगोलिक स्थितीमुळे दोन शोष खड्डा शौचालये बांधणे शक्य नाही. अशा ठिकाणीच फक्त प्रकारची
तांत्रिक दृष्टया योग्य असणारी शौचालये बांधण्यापूर्वी, राज्य शासनाची पूर्व परवानगी घेण्याबाबत शासन पत्र दिनांक २९/१२/२०१८ अन्वये सर्व जिल्हा परिषदांना कळविण्यात आले आहे. त्यामुळे नविन शौचालये बहुताश: दोन खड्डा शौचालये आहेत. दोन खड्डा शौचालयातील
वापरातील एका खड्डयांत मैला जमा झाला की, त्या खड्डयाचा वापर बंद करुन, दुसरा खड्डा वापरला जातो. पहिला खड्डा बंद केल्याने तेथे निर्वातीय स्थिती तयार होवून, काही कालांतराने मैल्याचे कंपोस्ट् खतात परिर्वतन होते. जे काढून झाडांना, शेतात खत म्हणून वापरता येते.

केंद्र शासनाने जुलै, २०२० मध्ये स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) टप्पा-II च्या मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या असून, त्यानुषंगाने पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या दिनांक २६/११/२०२१ च्या व दिनांक ०२/१२/२०२१ च्या शासन निर्णयान्वये
स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) टप्पा-II अंतर्गत वैयक्तिक तसेच सार्वजनिक स्तरावर घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापनाबाबत मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. त्यामध्ये मैला गाळ व्यवस्थापनाबाबत सविस्तर निर्देश देण्यात आले आहेत:-
त्यामध्ये पुढीलप्रमाणे नमूद आहे:-
सेप्टीक टँकमधील गाळाचे व्यवस्थापन करण्याच्या दृष्टीने, ग्रामपंचायतीच्या शाश्वत स्वच्छता आराखडयातील गावामध्ये अस्तित्वात असलेल्या सिंगल पिट, सेप्टीक टँक शौचालयांची यादी व त्यांचा अंतिम गाळ उपसा दिनांक याबाबतची माहिती, ग्रामपंचायतीकडे उपलब्ध असावी. सर्वसाधारणपणे सेप्टीक टँक उपसा करणाऱ्या संस्थाची यादी, नगरपरिषद/ नगरपालिका/महानगरपालिका इत्यादींकडे उपलब्ध असते. संबंधित ग्रामपंचायतींनी नजिकच्या नगरपरिषद / नगरपालिका / महानगरपालिका इत्यादींकडून
अशा संस्थांची माहिती घ्यावी. अशा संस्थांचे सेप्टीक टँक गाळ उपसा करण्याकरिता, किमान दर असणा-या संस्थेकडून सेप्टीक टँक गाळ उपसा करण्याच्या कार्यवाहीचे नियोजन करावे.

५०० पर्यंत लोकसंख्या असणाऱ्या गावांकरिता सिंगल पिंट, तसेच सेप्टीक टँक मधील गाळ, विनिर्दिष्ठ मल विघटन प्रक्रिया केंद्रावर (STP-SEWAGE TREATMENT PLANT) विघटन प्रक्रिया को ट्रिटमेंट (Co-treatment) करण्याकरिता भाडे तत्वावर घेण्यात आलेल्या वाहनाव्दारे निर्दिष्ठ ठिकाणी वाहून न्यावे. सेप्टीक टँकमधील गाळ उपसा करुन वहन करणाऱ्या संस्थेस भाडे देण्याची जबाबदारी संबंधित ग्रामपंचायतींची राहील.

मल विघटन प्रक्रिया केंद्र (STP-SEWAGE TREATMENT PLANT) व अशा सेप्टीक टँकमधील गाळ उपसा करुन वहन करणाऱ्या सर्व संस्थांच्या नोंदी संबंधित जिल्हा परिषद / टँकमधील गाळ उपसा करुन वहन करणाऱ्या
सर्व संस्थांच्या नोंदी संबंधित जिल्हा परिषद/ ग्रामपंचायतींकडे अद्यावत यादया उपलब्ध असाव्यात, गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांनी, पंचायत समिती गटातील ग्रामपंचायतींचा गट करुन, सर्व संबंधित ग्रामपंचायतींशी समन्वय साधावा व अशा ग्रामपंचायतींना सेप्टीक टँकमधील गाळ उपसा करुन वहन करणाऱ्या संस्थांची सेवा, उपलब्ध होईल, याबाबतचे नियोजन करुन, त्यासंदर्भातील कामाचे संनियंत्रण करावे.

५०० पेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या गावांकरिता मैला गाळ व्यवस्थापन प्रकल्प घेण्याकरिता जिल्हयांने त्यांचे ॲपबेसड व्दितीय सर्वेक्षण पूर्ण करुन मैल्याच्या व्यवस्थापनाकरिता प्रत्येक तालुक्यास एक याप्रमाणे मैला गाळ व्यवस्थापन केंद्र घेता येतील.

ज्या लोकसंख्येकरिता उपरोक्तनुसार Co-treatment कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

महाड (जि.रायगड) येथील आय.टी.आय इमारतीचे नुकसान झाल्याबाबत

(३६) ३९८९७ (०९-०४-२०२२). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) : सन्माननीय **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाड (जि.रायगड) येथील आय.टी.आय इमारतीचे मागील वर्षी आलेल्या महापुरात प्रचंड नुकसान झालेले असून सदर इमारतीच्या दुरुस्तीकरिता निधीचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला आहे काय,

(२) असल्यास, उक्त दुरुस्ती निधीच्या प्रस्तावाकरीता मान्यता देण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजेश टोपे (१३-०५-२०२२) : (१) नाही.

सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय, मुंबई यांचेकडून

१) औद्योगिक प्रशिक्षण संस्था,महाड या संस्थेचे दरवाजे,खिडक्या, फ्लोरिंग, पेंटिंग करणे या कामाच्या रु. १,१५,६२,६५४/-

२) औद्योगिक प्रशिक्षण संस्था,महाड या संस्थेचे छत दुरुस्तीचे रु. ५४,४२,१००/-

३) औद्योगिक प्रशिक्षण संस्था,महाड या संस्थेच्या अंतर्गत रस्ता दुरुस्तीचे
रु. ३६,४७, २१६/-

४) औद्योगिक प्रशिक्षण संस्था,महाड या संस्थेच्या नादुरुस्त असलेल्या विद्युतीकरणाचा रु.२९,२९,९५०/- प्रस्ताव प्राप्त असून सदर प्रस्ताव
रु.१५ कोटीच्या आत असल्याने संचालनालयस्तरावर मान्यता देण्यात आलेली आहे. त्यामुळे सदर प्रस्ताव शासनास सादर करण्यात आलेले नाहीत.

(२) व (३)

(१) औद्योगिक प्रशिक्षण संस्था, महाड या संस्थेचे दरवाजे, खिडक्या,फ्लोरींग, पेटिंग करणे या कामाचे रु.१,१५,६२,६५४/- च्या प्रस्तावास जिल्हा नियोजन समितीच्या दि. ०१.०३.२०२२ रोजीच्या आदेशान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. त्या अन्वये इमारतीचे नुतनीकरण, दुरुस्ती सिव्हील वर्कचे काम करुन अर्ध्या इमारतीचे रंगरंगोटीचे काम पुर्ण झाले आहे.

२) औद्योगिक प्रशिक्षण संस्था, महाड या संस्थेच्या छत दुरुस्तीच्या रु. ५४,४२,१००/- चा प्रस्ताव संस्थेकडून जिल्हा नियोजन समितीस सादर करण्यास्तव जिल्हा व्यवसाय शिक्षण व

प्रशिक्षण अधिकारी, रायगड, अलिबाग यांना सादर केला असता जिल्हा नियोजन समितीकडे आर्थिक वर्ष सन २०२१-२२ मध्ये पुरेसा निधी उपलब्ध नसल्याने सदर काम पुढील आर्थिक वर्षात सन २०२२-२३ मध्ये करण्याचे प्रस्तावित आहे.

३) औद्योगिक प्रशिक्षण संस्था, महाड या संस्थेच्या अंतर्गत रस्त्याचे दुरुस्तीचे रु. ३६,४७,२१६/- चा प्रस्ताव जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, रायगड, अलिबाग यांना सादर केला असता जिल्हा नियोजन समितीकडे आर्थिक वर्ष २०२१-२२ मध्ये पुरेसा निधी उपलब्ध नसल्याने सदर काम पुढील आर्थिक वर्षात २०२२-२३ मध्ये करण्याचे प्रस्तावित आहे.

४) औद्योगिक प्रशिक्षण संस्था, महाड या संस्थेच्या नादुरुस्त असलेल्या विद्युतीकरणाचे नूतनीकरण करणे या कामाच्या रु.२९,२९,९५०/- प्रस्तावास जिल्हा नियोजन समितीकडून प्रशासकीय मान्यता व निधी प्राप्त होवून काम सुरु झालेले आहे.

(४)

१) औद्योगिक प्रशिक्षण संस्था,महाड या संस्थेच्या छत दुरुस्तीच्या रु. ५४,४२,१००/- चा सदर प्रस्ताव संस्थेकडून जिल्हा नियोजन समितीस सादर करण्यास्तव जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, रायगड, अलिबाग यांना सादर केला असता जिल्हा नियोजन समितीकडे आर्थिक वर्ष २०२१-२२ मध्ये पुरेसा निधी उपलब्ध नसल्याने सदर काम पुढील आर्थिक वर्षात २०२२-२३ मध्ये करण्याचे प्रस्तावित आहे.

२) औद्योगिक प्रशिक्षण संस्था, महाड या संस्थेच्या अंतर्गत रस्त्याचे दुरुस्तीचे रु. ३६,४७,२१६/- चा प्रस्ताव जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, रायगड, अलिबाग यांना सादर केला असता जिल्हा नियोजन समितीकडे आर्थिक वर्ष २०२१-२२ मध्ये पुरेसा निधी उपलब्ध नसल्याने सदर काम पुढील आर्थिक वर्षात २०२२-२३ मध्ये करण्याचे प्रस्तावित आहे.

मुलुंड-ऐरोली या ठिकाणी प्रादशिक परिवहन कार्यालय सुरू करण्याबाबत

(३७) ४०५२१ (०९-०४-२०२२). श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई मधील पश्चिम उपनगराच्या धर्तीवर वडाळा प्रादेशिक परिवहन कार्यालयाची विभागणी करून मुलुंड-ऐरोली या ठिकाणी प्रादेशिक परिवहन कार्यालय सुरू करण्याचा प्रस्ताव प्रलंबित असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुलुंड-ऐरोली येथील जकात नाक्याच्या जागेवर प्रादेशिक परिवहन कार्यालय सुरू करण्याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,

(३) असल्यास, कार्यालय सुरू करण्याबाबत एकुण किती कालावधी निश्चित केला आहे,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

ॲड. अनिल परब (२६-०५-२०२२) : (१) नाही.
(२) अशा प्रकारचा निर्णय शासनाने घेतलेला नाही.
(३), (४) व (५) प्रश्नच उद्भवत नाही.

राज्यातील प्रत्येक गावात पाण्याची गुणवत्ता तपासणीसाठी 5 महिलांना प्रशिक्षण देणेबाबत

(३८) ४०५२७ (०९-०४-२०२२). श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर) : सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील 34 जिल्ह्यांमधील जल जीवन मिशन योजनेअंतर्गत नागरीकांचा सक्रिय सहभाग वाढविण्यासाठी दिनांक ०२ ऑक्टोबर, २०२१ रोजी ग्रामपंचायत, ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समितीची बैठक प्रस्तावित होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रत्येक गावांचा 5 वर्षासाठी कृती आराखडा तयार करणे, प्रत्येक गावांतील सक्रिय ५ महिलांना पाणी गुणवत्ता तपासणीसाठी प्रशिक्षीत करणे इत्यादी १८ बाबींची अंमलबजावणी करण्याच्या सुचना राज्य पाणी व स्वच्छता मिशनने जिल्हा परिषदांच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना दिल्या आहेत, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त १८ बाबींची प्रत्यक्षात अंमलबजावणी सुरु झाली आहे काय तसेच किती गांवातील महिलांना प्रशिक्षीत करण्यात आले आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गुलाबराव पाटील (२६-०५-२०२२) :(१) व (२) होय हे खरे आहे.
राज्य पाणी व स्वच्छता मिशनच्या दि.२४.०९.२०२१ रोजीच्या पत्रान्वये जल जीवन मिशन अंतर्गत ग्रामस्थांचा सक्रिय सहभाग वाढविण्यासाठी दि.०२ ऑक्टोबर २०२१ रोजी ग्रामपंचायत, ग्रामीण पाणी पुरवठा स्वच्छता समितीच्या बैठकीत चर्चा घडवून आणण्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व) यांना सुचना देण्यात आलेल्या आहेत. यामध्ये प्रत्येक गावातील सक्रिय 5 महिलांना गुणवत्ता तपासणीसाठी प्रशिक्षित करणे व इतर सर्व बाबींची समावेश आहे.
(३) यातील, सर्वच बाबींची अंमलबजावणी जिल्हा परिषद स्तरावर करण्यात येत आहे. दि.०५.०५.२०२२ रोजीच्या IMIS Dashboard वरील स्थितीस अनुसरुन राज्यातील ३९४११ गावांतील १९५१९६ महीलांना याबाबतचे प्रशिक्षण देण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

डहाणू व वाडा तालुक्यातील (जि. पालघर) येथील सार्वजनिक ठिकाणी 'स्वच्छ भारत मिशन अंतर्गत' सार्वजनिक शौचालयाची सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत

(३९) ४०६१६ (०९-०४-२०२२). श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) : सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डहाणू व वाडा (जि. पालघर) तालुक्यातील गाव-खेड्यापाड्यात, आठवडी बाजारपेठा, नाक्यावर व वर्दळीच्या ठिकाणी महिलांसाठी सार्वजनिक शौचालये नसल्याने 'स्वच्छ भारत मिशन अंतर्गत' सार्वजनिक शौचालयाची सुविधा उपलब्ध करुन देणे, सार्वजनिक ठिकाणी असलेल्या नादुरूस्त शौचालयाची त्वरित दुरूस्ती करणे व इतर मागण्यांसाठी श्रमजीवी संघटनेच्या महिला ठिणगीच्यावतीने डहाणू पंचायत समिती, वाडा तहसिलदार कार्यालय तसेच विविध ठिकाणी दिनांक २० जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास आंदोलन करण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त आंदोलनाच्या मागण्यांप्रकरणी श्रमजीवी संघटनेच्या शिष्टमंडळासोबत डहाणू गटविकास अधिकारी, वाडा तहसिलदार व संबंधित अधिकारी यांच्यासोबत दिनांक २० जानेवारी, २०२२ रोजी वा त्यादरम्यान घेतलेल्या बैठकीनुसार कोणती कार्यवाही केली आहे,

(३) तसेच सार्वजनिक शौचालयांची 'स्वच्छ भारत मिशन अंतर्गत' दुरुस्ती व सुविधा उपलब्ध करुन देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गुलाबराव पाटील (२६-०५-२०२२) : (१) दिनांक २० जानेवारी, २०२२ रोजी श्रमजीवी संघटनेच्या महिला ठिणगीचे शिष्टमंडळ यांनी गट विकास अधिकारी, डहाणू व तहसिलदार, वाडा यांची भेट घेऊन, विविध मागण्यांबाबत निवेदन दिले.

(२) डहाणू व वाडा तालुक्यामध्ये स्वच्छ भारत अभियान (ग्रा.) अंतर्गत सन २०२१-२२ पर्यंत अनुक्रमे ५४ व ४८ तसेच अन्य योजनांतर्गत अनुक्रमे २१ व २१ सार्वजनिक शौचालये बांधण्यात आली असून, सदर सार्वजनिक शौचालये सुस्थितीत आहेत. तसेच, डहाणू तालुक्यामध्ये ३० व वाडा तालुक्यामध्ये २५ सार्वजनिक शौचालये बांधकामांचे उद्दिष्ट घेण्यात आले आहे. डहाणू तालुक्यासाठी घेण्यात आलेल्या ३० सार्वजनिक शौचालय बांधकामाच्या उद्दिष्टांपैकी १९ कामांना व वाडा तालुक्यातील २५ कामांपैकी १६ कामांना तालुकास्तरावरुन तांत्रिक व प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून, कार्यारंभ आदेश देण्याची प्रक्रिया सुरु आहे. डहाणू तालुक्यातील उर्वरित ११ कामांपैकी ९ कामांचे प्रस्ताव तांत्रिक मान्यतेच्या प्रक्रियेत आहेत व २ प्रस्ताव ग्रामपंचायतीकडून घेण्याचे करण्याचे काम सुरु आहे. तसेच, वाडा तालुक्यातील उर्वरित ९ कामांचे प्रस्ताव ग्रामपंचायतीकडून घेण्याचे काम सुरु आहे.

(३) राज्यात केंद्र पुरस्कृत स्वच्छ भारत अभियान (ग्रा.) ही योजना केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार राबविण्यात येते. केंद्र शासनाने जुलै, २०२० मध्ये स्वच्छ भारत अभियान (ग्रा.) टप्पा-२ च्या मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत. त्यानुषंगाने दिनांक ०२/११/२०२० च्या शासन परिपत्रकान्वये देण्यात आलेल्या सूचना अधिकमित करुन, त्यानंतर दिनांक १२/०४/२०२२ च्या शासन निर्णयान्वये स्वच्छ भारत अभियान (ग्रा.) टप्पा-२ च्या अंतर्गत

सार्वजनिक/सामुदायिक शौचालये (CSC) बांधकामाबाबत मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत. त्यामध्ये सार्वजनिक/सामुदायिक शौचालयांच्या (CSC)देखभाल व दुरुस्तीबाबत स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत.
(4) प्रश्न उद्‌भवत नाही.

संग्रामपुर, येथील जि.प. शाळेत पोषण आहारात दिलेल्या बिस्कीट पुडीयात अळी आढळल्याबाबत

(४०) ४०७५१ (०१-०४-२०२२). श्री.राजेश एकडे (मलकापूर) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) संग्रामपुर, येथील जि.प. शाळेत वर्ग ८ मध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शालेय पोषण आहाराच्या बिस्किटाच्या पुडीमध्ये अळी आढळल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संबंधित बिस्किट कंपनीच्या कंत्राटदारांविरुद्ध कारवाईची मागणी पालकांमार्फत शिक्षण विभागाकडे केली आहे हे खरे आहे काय,
(३) असल्यास, पोषण आहारात झालेल्या गैरकारभाराबाबत शासनाने संबंधित कंत्राटदाराविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

प्रा. वर्षा गायकवाड (११-०५-२०२२) : (१) अंशत: खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) संबंधित शाळेत देण्यात आलेल्या न्युट्रीटीव्ह स्लाईसच्या देयकाची रक्कम पुरवठादाराच्या देयकातून कपात करण्याची कार्यवाही करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

पिंपळखुटी (ता.केळापूर, जि.यवतमाळ) येथील सिमा तपासणी चेकपोस्टवर अनुचीत प्रकार घडत असल्याबाबत

(४१) ४०८०७ (०९-०४-२०२२). डॉ.अशोक उईके (राळेगाव) : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) यवतमाळ जिल्हा कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या पिंपळखुटी (ता.केळापूर, जि.यवतमाळ) येथील चेकपोस्ट कार्यालयामध्ये सुमारे २२ कर्मचारी कार्यरत असतांना २०० ते ३०० कि.मी. अंतरावरील अमरावती, वाशिम व अकोला येथील अधिकारी यांची आरटीओ चेकपोस्ट करिता नियुक्ती करण्यात येत असून कार्यालयातील कर्मचाऱ्यांऐवजी खाजगी व्यक्तींची नियुक्ती करण्यात येत असल्याने तपासणी नाक्यावर अनुचित प्रकार घडत असल्याचे दिनांक १२ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, परिवहन आयुक्त यांनी पिंपळखुटी तपासणी चेकपोस्टला भेट दिली असता बाहेरच्या जिल्हयाचे अंतर बघता अंतरजिल्हातील कर्मचारी यांना नियुक्ती देण्यात यावी असे आदेश देण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रश्न भाग २ मधील आदेशानुसार तपासणी नाक्यावर खाजगी लोकांची नियुक्ती थांबवून सदर तपासणी नाक्यावर घडत असलेल्या अनुचित प्रकाराला आळा घालण्याच्या दृष्टीने कोणत्या उपाययोजना करण्यात आल्या वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

ॲड. अनिल परब (२६-०५-२०२२) : (१) व (२) हे खरे नाही.
(३) सीमा तपासणी नाक्यावर वाहनांची काटेकोरपणे तपासणी करण्यासाठी आळीपाळीने प्रत्येकी ८ तासाप्रमाणे मोटार वाहन निरीक्षकांना नियुक्ती देण्यात येते. तसेच सीमा तपासणी नाक्यावरच्या कामकाजावर नियंत्रण ठेवण्यासाठी सहायक प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांची नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

सीमा तपासणी नाक्यांवर अनुचित प्रकारांवर आळा घालण्यासाठी संगणकीकरण व आधुनिकीकरण करण्यात आले असून स्वयंचलित वजन काटे बसविण्यात आले आहेत. तसेच, व्हिडीओ कॅमेरे बसविण्यात आले असून तेथील कामकाजावर नियंत्रण कक्षाद्वारे देखरेख ठेवली जाते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

रत्नागिरी जिल्हयातील पर्यटन विकासाचा आराखडा तयार करुन निधी उपलब्ध होण्याबाबत

(४२) ४०९१६ (०९-०४-२०२२). श्री.राजन साळवी (राजापूर) : सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रत्नागिरी जिल्हयातील पर्यटन विकासाचा आराखडा तयार करुन प्रशासकीय मंजुरी देऊन निधी उपलब्ध होण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक २७ डिसेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास मा.पर्यटन मंत्री महोदयांना पत्रव्यवहार केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राजापूर तालुक्यातील कशेळी-अणसुरे व आंबोळगड हे महत्वाची पर्यटन स्थळे समुद्रकिनारी असल्याने याठिकाणी पर्यटक मोठया संख्येने येत असतात, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू ठिकाणी विकास केल्यास पर्यटनाला चालना मिळून स्थानिकांना रोजगार उपलब्ध होणार आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, निधी उपलब्ध होण्याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. आदित्य ठाकरे (१९-०५-२०२२) : (१) दिनांक ०५.०३.२०२१ चे निवेदन प्राप्त झाले आहे.
(२) व (३) होय.

(४) प्रादेशिक पर्यटन विकास योजना सन २०२१-२२ अंतर्गत आबोंळगड व कशेळी-अणसुरे, ता. राजापूर येथील समुद्रकिनारी पर्यटकांसाठी मुलभूत सुविधा विकसित करुन सुशोभिकरण करणे या प्रत्येकी रु.१००.०० लक्षच्या कामांना प्रशासकीय मान्यता देऊन सदर दोन्ही ठिकाणच्या कामांसाठी प्रत्येकी रु.३०.०० लक्ष निधी जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांना वितरीत करण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

आरटीओ कर्मचा-यांनी राज्यभर आंदोलन केल्याबाबत

(४३) ४०९३४ (०९-०४-२०२२). श्री.संग्राम थोपटे (भोर), ॲड.राहूल कुल (दौंड), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अभिमन्यु पवार (औसा) : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य परिवहन विभागाने ऑनलाईन शिकाऊ वाहतूक परवाना आणि नवीन वाहन नोंदणी करण्याचा निर्णय घेतला असतांना आरटीओ विभागात कामगार कपात करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या निर्णयाविरोधात आरटीओ कर्मचा-यांनी माहे जुलै, २०२१ च्या दुस-या आठवडयात राज्यभर आंदोलन केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने या आंदोलनाची दखल घेऊन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

ॲड. अनिल परब (२६-०५-२०२२) :(१) नाही.
(२) व (३) मोटार वाहन विभाग कर्मचारी संघटनेमार्फत मोटार वाहन कायद्यातील झालेल्या सुधारणांची अंमलबजावणी करताना “कर्मचाऱ्यांच्या हिताला बाधा निर्माण करण्यास विरोध” या अनुषंगाने दिनांक ०७.०७.२०२१ रोजी निदर्शनाद्वारे राज्यव्यापी आंदोलन करण्यात आले होते. मोटार वाहन विभागाच्या कामकाजाचे बदलते स्वरुप विचारात घेऊन त्याप्रमाणे सुधारीत आकृतीबंध निश्चित करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या विविध ग्राहकांकडे प्रलंबित पाणीपट्टीची थकीत रक्कम वसूल करण्याबाबत

(४४) ४१७३९ (०९-०४-२०२२). श्री.राजु (बाबा) जयवंतराव आवळे (हातकणंगले) : सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या विविध ग्राहकांकडे पाणीपट्टीचे रुपये ९१९ कोटी ५९ लाख रुपये थकीत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कोणकोणत्या विभागात किती थकबाकी आहे तसेच सदर थकबाकी वसूल करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गुलाबराव पाटील (२६-०५-२०२२) : (१) व (२) होय, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत पाणी पुरवठा करण्यात येणाऱ्या विविध विभागातील ५१ नागरी व ग्रामीण पाणी पुरवठा केंद्रांकडील पाणीपट्टीची एकूण मुद्‌यल रु.५१६.२९ कोटी व विलंब आकार रु ४०३.३० कोटी अशी एकूण रुपये ९१९.५९ कोटी थकबाकी आहे. दि. २१.०१.२०२२ रोजीच्या परिपत्रकान्वये थकबाकी विलंब आकार व दंडनीय व्याज सवलतीची अभय योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून लागू करण्यात आला आहे. सदर योजना प्रभाविपणे राबवून जास्तीत जास्त थकबाकी वसूल करण्याची कार्यवाही मजीप्राकडून करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

शेतकऱ्यांच्या विकासाकरिता राबविण्यात येणा-या शासनाच्या कृषी योजने मधील वाढत्या अडचणी सोडविण्याबाबत

(४५) ४२५५१ (१२-०४-२०२२). श्री.शिरीष चौधरी (रावेर) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कृषी राजा असलेल्या शेतकऱ्याच्या विकासासाठी शासनाकडे विविध योजना असून या योजनासाठी घटकांच्या मोका तपासणी करुन कोटयवधीचा निधी शेतकऱ्यापर्यंत पोहचविण्याचे काम कृषी पर्यवेक्षक संवर्ग सध्या करित असल्याचे दिनाक 18 जानेवारी,२०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या योजना राबवितांना प्रत्यक्ष क्षेत्रावर व ॲपमध्ये खुप प्रमाणात अडचणी निर्माण होत आहे हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या संदर्भात शासनाने पर्यवेक्षकांच्या अडचणीची माहिती घेवून त्या सोडविण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दादाजी भुसे (२६-०५-२०२२) : (१) अंशत: खरे आहे. कृषि पर्यवेक्षक तसेच कृषि विभागाच्या विविध स्तरांवरील अधिकाऱ्यांच्या छाननी पश्चात शेतकऱ्यांना अनुदान वितरित करण्यात येत आहे.
(२) व (३) अंशत: खरे आहे, कृषि विभागाच्या योजना राबवितांना प्रत्यक्ष क्षेत्रावर काम करताना येणाऱ्या तांत्रिक अडचणी विचारात घेऊन ॲपमध्ये आवश्यक त्या सुधारणा करण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

'महाराष्ट्र भूजल कायदा' शेतीसाठी घातक ठरत असल्याबाबत

(४६) ४३०१० (३१-०३-२०२२). श्री.शिरीष चौधरी (रावेर) : सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) 'महाराष्ट्र भूजल कायदा'-2013 हा 1 जून 2014 पासून लागू करण्यात आला या कायदयामधील विविध कलमे शेतकऱ्यांवर अन्याय करणारी असून शेतीसाठी अयोग्य ठरत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील कायदयातील शेतकऱ्यांसाठी अयोग्य ठरणारी कलमे वगळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गुलाबराव पाटील (२७-०५-२०२२) : (१) हे खरे नाही.
महाराष्ट्र भूजल (विकास व व्यवस्थापन) अधिनियम, २००९ राज्यात १ जून, २०१४ पासून लागू झालेला आहे. या अधिनियमाचा मुख्य उद्देश "पुरवठा व मागणी व्यवस्थापन उपाययोजनांमार्फत वापरकर्त्यांच्या विविध प्रवर्गांकरीता विहित दर्जाच्या भूजलाचा कायम, समन्यायी आणि पूरेसा पुरवठा सूकर करणे आणि त्याची खातरजमा करणे, सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांचे जतन करणे आणि महाराष्ट्र राज्यात भूजलाच्या समुपयोजनांचे सामुहिक सहभागाने व्यवस्थापन व विनियमन करण्यासाठी राज्य भूजल प्राधिकरण आणि जिल्हास्तरीय प्राधिकरणे स्थापन करणे, आणि त्याच्याशी संबंधित व अनुषंगिक बाबींची तरतूद करणे" असा आहे.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(3) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात ग्रामीण भागात ४० ली. प्रतीमाणसी व शहरी भागात १३५ ली. प्रतीमाणसी असलेल्या पाणी वाटप मापदंडामधील तफावतीमध्ये बदल करण्याबाबत

(४७) ४३४३८ (०९-०४-२०२२). अॅड.राहूल कुल (दौंड), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अभिमन्यु पवार (औसा) : सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाच्या १९९६ च्या बृहत आराखड्यानुसार, ग्रामीण भागातील जनतेला दरडोई दरदिवशी ५५ लीटर पाणी या दराने पाणी पुरवठा करण्याबाबतचा मापदंड निश्चित केला होता परंतु सन २००४ पासून जागतिक बँकेच्या सहकार्याने राबविण्यात येत असलेल्या जलस्वराज्य कार्यक्रमामध्ये हाच मापदंड दरडोई दरदिवशी ४० लीटर पर्यंत खाली आणण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बृहत आराखड्यानुसार शहरी भागातील नागरीकांना, संबंधीत शहराच्या दर्जानुसार दरडोई दरदिवशी १३५ लीटर पाणी पुरवठा करण्याबाबतचा मापदंड स्विकारण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त ग्रामीण व शहरी भागातील मापदंडामध्ये असलेल्या तफावतीमध्ये बदल करण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त ग्रामीण व शहरी भागातील पाणी वापराच्या मापदंडामध्ये असलेल्या तफावतीमध्ये बदल करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गुलाबराव पाटील (२६-०५-२०२२) : (१) हे खरे आहे.
(२) शहरी भागातील नागरीकांना पाणी पुरवठा करण्यासाठी बृहत आराखडा तयार करण्यात आलेला नाही. नागरी भागासाठी केंद्र शासनाच्या CPHEEO या संस्थेने विहित केलेले खालील निकष लावण्यात येतात.

अ.क्र.	नगर/ शहराचे वर्गीकरण	दरडोई पाणी पुरवठा मापदंड
१	मलनिंस्सारण योजना नसलेल्या शहरासाठी पा.पु. योजना	७०
२	मलनिंस्सारण योजना अस्तित्वात / प्रस्तावित असलेल्या शहरासाठी पा.पु. योजना	१३५
३	मलनिंस्सारण योजना अस्तित्वात / प्रस्तावित असलेल्या मोठया शहरासाठी (मेट्रो/मेगा) पा.पु. योजना	१५०

(३) होय,
(४) व (५) जल जीवन मिशनच्या मार्गदर्शक सुचनांनुसार राज्यातील ग्रामीण भागात 55 लि. प्रतिदिन प्रतिमाणसाी पाणी पुरवठा करण्यात येत आहे. शहरी भागातील दरडोई पाणी पुरवठा निकष ग्रामीण भागाकरिता लागु करताना पाण्याची उपलब्धता सांडपाणी व्यवस्था/पायाभूत सुविधा/तांत्रिक/आर्थिक बाबी तपासुन घेण्यात येत आहे.

जल-जीवन मिशन अंतर्गत मंजूर पाणी पुरवठा योजनांची कामे करण्यासाठी तयार करण्यात येणाऱ्या ठेकेदारांच्या पॅनल प्रक्रियेमध्ये कोकणातील स्थानिक ठेकेदारांवर होणाऱ्या अन्यायाबाबत

(४८) ४३५७६ (०९-०४-२०२२). श्री.शेखर निकम (चिपळूण) : सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाच्या पाणी पुरवठा विभागांतर्गत प्रसिध्द करण्यात आलेल्या ठेकेदार पात्रता निकष तांत्रिक क्षमतेअंतर्गत मागील १० वर्षामध्ये पाणी पुरवठा योजनेच्या केलेल्या कामांची रक्कम ही १५ कोटी रुपयांपेक्षा अधिक असणे आवश्यक आहे, हे खरे आहे काय.
(२) असल्यास, मागील १० वर्षामध्ये कोकण विभागात पाणी पुरवठ्याची मोठ्या स्तरावर कामे झालेली नसणे तसेच जिल्हा परिषदेमार्फत रु. ५० लक्ष पेक्षा जास्त पाणी पुरवठ्याच्या कामांची संख्या अत्यल्प आहे, हे ही खरे आहे काय.

(३) असल्यास, प्रश्न भाग १ मधील नमुद निविदेतील अटी ह्या जाचक असून कोकणातील स्थानिक ठेकेदार या अटी व शर्तीमुळे निविदेप्रक्रियेपासून वंचित राहतात, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, कोकणातील भौगोलिक क्षेत्राचा आणि स्थानिक अडचणींचा विचार करता कोकणातील स्थानिक ठेकेदार हा या अंतर्गत पॅनलमध्ये असणे आवश्यक असतांना सिंधुदूर्ग, रायगड, रत्नागिरी ह्या जिल्ह्यांमध्ये राबविण्यात आलेल्या नळपाणी पुरवठा योजनांमध्ये दुसऱ्या विभागातील ठेकेदारांचा सहभाग असल्याने कोकणातील बहुतांश योजना या भौगोलिक अडचणी व स्थानिक प्रश्नांमुळे अपूर्ण अवस्थेत असून झालेली कामे देखील समाधानकारक नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, जल जीवन मिशनचे उद्दिष्ट कमी वेळेत साध्य होण्याच्यादृष्टीने विभागांतर्गत पॅनल प्रक्रियेमध्ये जास्तीत जास्त कोकणातील स्थानिक ठेकेदारांचा समावेश करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गुलाबराव पाटील (२५-०५-२०२२) : (१) (२) अंशत: खरे आहे.

पाणी पुरवठा व स्वच्छता विभागांतर्गत राज्य पाणी व स्वच्छता मिशनद्वारे केंद्रशासनाच्या जल जीवन मिशन कार्यक्रमाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार प्रसिद्ध करण्यात आलेल्या कंत्राटदारांचे पॅनल तयार करण्यासाठी अ, ब, व क संवर्गाकरिता निविदा प्रसिद्ध करण्यात आल्या होत्या. त्यापैकी, "क" संवर्गामध्ये रु.0.5 कोटी ते 5.00 कोटी पर्यंतच्या कामांसाठी विभागनिहाय कंत्राटदारांचे पॅनल तयार करण्यासाठी निविदा मागविण्यात आल्या होत्या. याकरिता पात्र निविदाकारांची निविदा क्षमता रु.15 कोटी असणे तसेच मागील 12 वर्षात जास्तीत जास्त 10 योजनांमध्ये एकूण रु.15 कोटीची नळ पाणी पुरवठा योजनांची कामे केली असल्याचा अनुभव असण्याची अट नमूद करण्यात आली होती. तथापि, सद्य:स्थितीत "क" संवर्गाच्या सर्व विभागाच्या निविदा रद्द करण्यात आल्या आहेत. तसेच कोंकण विभागाकरिता प्रसिद्ध करण्यात आलेली "क" (C) संवर्गाकरिताची निविदा (योजनांची किंमत रु.0.5 कोटी ते रु.5.00 कोटी) मध्ये अंदाजित 950 योजना व एकूण अंदाजीत किंमत रु. 956.70 कोटी इतक्या रकमेच्या नळ पाणी पुरवठा योजनांचा समावेश करण्यात आला होता. या व्यतिरिक्त, रु.50.00 लक्ष खालील सुमारे 3676 योजना ज्याची एकूण अंदाजित किंमत रु.860.71 कोटी आहे, निविदा प्रक्रीयेत समाविष्ठ करण्यात आलेल्या नव्हत्या. तथापि, सद्य:स्थितीत "क" संवर्गाच्या निविदा रद्द करण्यात आली असल्याने सदर बाब लागू होत नाही.
(३) सद्य:स्थितीत "क" संवर्गाची निविदा रद्द करण्यात आली असल्यामुळे प्रश्न उद्भवत नाही.
(४) (५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

करोडी (जि.औरंगाबाद) येथे आरटीओच्या कामाकरीता येणाऱ्या वाहन धारकांची गैरसोय होत असल्याबाबत

(४९) ४४०७१ (०९-०४-२०२२). श्री.प्रदीप जैस्वाल (औरंगाबाद मध्य) : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद येथील प्रादेशिक परिवहन कार्यालयाअंतर्गत होणारी कामे जागे अभावी करोडी येथे केली जातात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ठिकाणी एकच अधिकारी असल्याने वाहन धारकांना तासनतास उन्हात ताटकळत प्रतीक्षा करावी लागते तसेच येथे महिला व पुरुषांसाठी प्रसाधन गृह नसल्याने नागरीकांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने करोडी येथील नागरीकांची गैरसोय टाळण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

ॲड. अनिल परब (२६-०५-२०२२) :(१) होय.

(२) व (३) हे खरे नाही.

मौजे करोडी, औरंगाबाद येथे पक्की अनुज्ञप्तीच्या कामासाठी ३ मोटार वाहन निरीक्षक व व्यावसायिक वाहनांच्या योग्यता प्रमाणपत्र नूतनीकरण कामकाजाकरीता ४ मोटार वाहन निरीक्षकांची नियुक्ती केली जाते. तसेच त्यांना सहाय्य करण्यासाठी ४ परिक्षाविधीन सहायक मोटार वाहन निरीक्षक व १ लिपिकवर्गीय कर्मचारी कार्यरत असतात. कार्यालयात कामकाजासाठी पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध असल्याने वाहनधारकांना जास्त वेळ प्रतिक्षा करावी लागत नाही.

मौजे करोडी येथे वाहनधारक महिला व पुरुषांसाठी स्वतंत्र प्रसाधनगृहाची व्यवस्था करण्यात आलेली आहे. वाहनधारकाच्या माहितीकरीता त्याबाबतचे फलक लावण्यात आलेले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्य शेक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदमध्ये उपसंचालक (प्राचार्य) पदावर प्रतिनियुक्तीमध्ये अनियमितता झाल्याबाबत

(५०) ४४४१५ (१६-०३-२०२२). श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदे मध्ये उपसंचालक (प्राचार्य) पदावर सन २०१५ पासून प्रतिनियुक्तीवर श्री.गरड कार्यरत आहेत हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरचे पद D-Grade करून त्यांची प्रतिनियुक्ती करण्यात आली हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, एकाच पदावर कार्यरत ठेवण्याबाबत तसेच या पदासाठी शासनाचे नियम व अटीची पूर्तता केली आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाचे नियम व अटींची पूर्तता झाली नसल्यास श्री गरुड व संबंधित दोषीविरुध्द शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

प्रा. वर्षा गायकवाड (२४-०५-२०२२) : (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

विधान भवन : **राजेन्द्र भागवत**
मुंबई. **प्रधान सचिव,**
महाराष्ट्र विधानसभा.

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.